पुणें मराठी ग्रंथालय
निबंध
क्र—
015993



# समर्थविद्यालय.

(तळेगांव दाभाडे.)

विष्णु गोविंद विजापूरकर. एम्. ए.

आवृत्ति २ री.

मार्गशीर्ष शुद्ध १५।१८३०

किंमत ८=.

कर्नाटक छापखाना, गिरगांव, मुंबई.

## विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १ हल्लींची स्थिति. ... ... | १ |
| २ परावलंबन. ... ... ... | २ |
| ३ स्वदेशी चळवळ व स्वदेशी शिक्षण.... ... ... | ४ |
| ४ स्वावलंबन हाच मार्ग. ... | ७ |
| ५ आमच्या अडचणी. ... ... | ७ |
| ६ राज्यकर्त्यांचे हेतू व उद्गार. | ८ |
| ७ शिक्षणांतील अराष्ट्रीय वळण. | १० |
| ८ सरकारचें दुर्लक्ष. ... ... | ११ |
| ९ हिंदुस्थानचें एकराष्ट्रीयत्व. | १२ |
| १० ब्रह्मचर्याचें महत्व. ... ... | १५ |
| ११ दुय्यम शिक्षणास उशीरा प्रारंभ होण्याची आवश्यकता. | १८ |
| १२ निरोगीपणाची अट. ... ... | १९ |
| १४ गृहशिक्षकापासून नुकसान. | २१ |
| १४ मार्क व परीक्षा यांचें फाजील माहात्म्य. ... ... ... | २२ |
| १५ शक्ति व शील यांचा संबंध. | २३ |
| १६ विद्यार्थिगृह ... ... ... | २४ |
| १७ पालकांस विनंति. ... ... | २५ |
| १८ रीतीभाती व संप्रदाय यांचें ज्ञान.... ... ... ... | २६ |
| १९ खेळ व करमणूक. ... .. | २७ |
| २० अर्वाचीन व परकीय चांगल्या गोष्टींचा स्वीकार ... ... | २८ |
| २१ शास्त्रीय, औद्योगिक व व्यापारीय शिक्षण. ... ... | ३१ |
| २२ आशा व आकांक्षा. ... ... | ३२ |

| विशय | पृष्ठ. |
|---|---|
| २३ सहानुभूति व साहाय्यप्रार्थना | ३४ |
| २४ सरकारी नोकरीची दिशा वर्ज करणें शक्य आहे. ... | ३६ |
| २५ पुढें काय करावें ? स्वतंत्र. | ३८ |
| धंदे व व्यवसाय. ... ... | ३९ |
| २६ राष्ट्रोपदेशक व लोकनायक. | ४० |
| २७ सशक्तपणाच्या अटीचे हेतू व प्रमाण. ... ... ... | ४१ |
| २८ उडत उडत चौकशी व खरी आस्था. ... ... ... | ४४ |
| २९ मागील भागांचें थोडक्यांत दिग्दर्शन. ... ... ... | ४५ |
| १ स्वभाषाद्वारा शिक्षण. | ४५ |
| २ एक देशभाषा-संस्कृताचें महत्त्व व सुलभपणा | ४५ |
| ३ राष्ट्रीयग्रंथवाचनाचा नैतिक परिणाम ... | ४६ |
| परराष्ट्रीय वीर वगैरेंचीं चरित्रें | |
| ४ ग्रीस व रोमचे इतिहास. | ४९ |
| ५ इंग्रजी भाषा एक आवश्यक विषय.... ... | ४९ |
| ६ धंदेशिक्षण ... ... | ५० |
| ७ व्यायाम, करमणूक, ब्रह्मचर्य वगैरे.... ... | ५१ |
| ३० पूर्वशिक्षण. ... ... ... | ५१ |
| ३१ शिक्षकाश्रम. ... ... ... | ५२ |
| ३२ उपसंहार. ... ... ... | ५३ |

# समर्थविद्यालय.

## ( तळेगांव दाभाडे )

हल्लीं हिंदुस्थान देशास जी स्थिति प्राप्त झाली आहे ती समाधानकारक आहे, तिच्यामध्यें विशेष फेरबदल करण्याचें कारण नाहीं, तिच्यासंबंधानें असंतोषाचे किंवा उद्वेगाचे उद्गार कित्येक लोकांच्या मुखावाटे अथवा लेखांतून बाहेर पडतात ते निराधार आहेत असें ह्मणणारे लोक प्रायः नाहींत असें गृहीत धरून आपण चालत आहों. स्थितीच्या दुःसहतेविषयींही मतभेदास फारशी जागा नाहीं. या दोन्हीही वाक्यांत ' प्रायः ' व ' फारशी ' हे दोन मर्यादक शब्द घालण्याचें कारण इतकेंच आहे कीं कोणी हरीचा लाल आमच्यासारखे सुखी कोणी नाहींत असें ह्मणणारा पुढें आला किंवा "असेल आमची स्थिति थोडी वाईट पण आजच तिच्याविषयीं विचार करण्याचें कांहीं कारण नाहीं " असें ह्मणणारा एखादा माणूस असला तर अशा माणसांच्या सुखासमाधानाच्या आड येण्याची आमची इच्छा नाहीं. परंतु तीव्र स्वरूपास पावलेल्या रोग्याप्रमाणें एका क्षणाचीही उपेक्षा करण्याची सवड नाहीं व असेल तेवढ्या उत्साहानें व नेटानें परिश्रम करून प्रकृति सुधारणें जरूर आहे अशी आमच्या राष्ट्राची आज दशा झालेली आहे असें मानून आह्मीं हें लिहीत किंवा बोलत आहों हें वाचकांस सांगावयास पाहिजे असें नाहीं. आपल्याहून निराळ्या मताचे पण आळसांत, आनंदांत किंवा

ऐषआरामांत राहणाऱ्या लोकांस दूषण देत बसण्यासही आपणांस फुरसत नाहीं. जेवढे साक्षात् आपल्या कार्यास विघ्न करण्यास तत्पर होतील त्यांचाच कदाचित् विचार करावा लागेल. त्यांच्याशीं वाद-रणेंही करावीं लागतील; पण तीं सर्व उपायचिंतनाच्या संबंधाचीं रणें असणार. आमच्याप्रमाणेंच देशस्थितीविषयीं ज्यांचे विचार नसतील त्यांच्या वाटेसही आह्मीं जाणार नाहीं. ज्यांना सर्व आबा-दीआबाद आहे असें वाटत असेल त्यांच्याशीं काय बोलावयाचें ? तुह्मीं खुशाल आहां, तर खुशाल रहा ह्मणून तो मार्ग सोडावयाचा.

सर्व संकटांत मोठें संकट राजकीय संकट ह्मणजे परवशता हें आहे. सर्व विपत्ति व आपत्ति तन्मूलक आहेत ही गांठ प्रत्येकानें आपल्या मनाशीं पक्की घालून ठेवावी. राष्ट्राची सामाजिक स्थिति बिघडली आहे, दुष्ट चालीरीतींचा पगडा बसला आहे, सत्यप्रीति नाहींशी झाली आहे, परस्परांवरील विश्वास उडाला आहे, कलों-कौशल्याचा ऱ्हास झाला आहे, व्यापार ठांर बुडाला आहे, प्रजा अशक्त झाली आहे, इत्यादि सर्व मूळ रोगाचीं बाह्य परिणामचिन्हें आहेत ह्मणून या चिन्हांस फाजील महत्त्व देऊं नये. यांपैकीं कोण-त्याही एकाच्या नादीं लागूं नये. मूळ रोगाच्या निर्मूलनार्थ सर्व गोष्टी साधनीभूत आहेत अशी भावना बाळगूनच सर्व चळवळी चालू राहूंद्यात, ही गोष्ट अलीकडे कंठरवानें सांगितली पाहिजे असें वाटण्यास कारण झालें आहे. कोणी ह्मणतो परदास्यांत असणाऱ्या लोकांस राजकीय चळवळ ती कसली ? कोणी ह्मणतो उगीच बडबड करण्यांत अर्थ काय आहे ? कोणी विचारतो असें कोठें सभा भरवून किंवा राजकीय चळवळ करा ह्मणून लोक जागे होतात काय ? कोणी ह्मणतो सर्व भिस्त औद्योगिक उन्नतीवर ठेविली पाहिजे. कोणाची सर्व

मदार नैतिक उन्नतीवर आहे. मद्यपाननिषेधक मंडळ्या स्थापन होऊन लोकांतील हें व्यसन नाहींसें झाल्याशिवाय कोणताच मार्ग खुला होत नाहीं असेंही कित्येक प्रतिपादितात. असे एकदेशीय विचार चालले आहेत; परंतु या सर्वांस राजसत्तेचें पाठबळ पाहिजे हें तत्त्व विसरलें जातें. राजसत्ता विरोधी असल्यास कोणतेंही कार्य करितां येणें शक्य नाहीं. वाटेल त्या कार्यांत विघ्न करण्याइतकें राज्यकर्त्यांस सुलभ कार्य कोणतेंच नाहीं. यासाठीं ती राजसत्ता नियंत्रित केली पाहिजे. प्रस्तुतकाळीं ज्यांच्यावर त्या सत्तेचा प्रयोग होतो त्यांच्या इच्छा व आशा यांचा बिलकुल विचार न करितां राजसत्ता चालविली जाते. तिला मर्यादेंत आणणें हें पहिलें काम आहे व राष्ट्रांतील सर्व दूरदर्शी व दीर्घोद्योगी स्त्रीपुरुषांचें इकडे लक्ष्य लागलें पाहिजे. पुरुषांनासुद्धां ही गोष्ट पुरती कळत नाहीं, मग स्त्रियांना कोठून कळणार ? आपण आहों कोणत्या स्थितींत, आपणास जावयाचें आहे कोठें ? याची अंधक कल्पनासुद्धां या अवाढव्य राष्ट्रांत फार थोडक्या लोकांना आहे. सर्व राष्ट्राचा कारभार दुसऱ्यांनीं पहावा व राष्ट्रांतील यच्चयावत् लोकांनीं कष्टाळू व सोशिक जनावराप्रमाणें काबाडकष्ट करावे अशी स्थिति येऊन आपल्या देशाचे ह्मणजे आपल्या जन्मभूमीचे आपण मालक आहों हें विसरून जावें किंवा स्मरून आंतल्याआंत झुरून जावें याहून दुसरी शोचनीय स्थिति कोणती असणार ? तर हें स्वस्थितिज्ञान लोकांस करून देण्याचें कार्य सर्वांत अगोदर हातीं घेतलें पाहिजे असा आमचा ठाम ग्रह झाला आहे. परवशता ही आह्मांस घातक आहे. हल्लीं असलेल्या राज्यपद्धतींत राहण्यास आह्मी नाखूष नाहीं; पण स्ववश असलों तरच राहूं. परवशता ह्मणजे परनेयता. आमचें हिताहित

आह्मांस जसें कळेल तसें तें दुसऱ्यांस कळणार नाहीं. आमचा पैसा आह्मीं जसा जपून खर्च करूं तसा दुसऱ्याच्या हातून खर्च होणार नाहीं. आदा व खर्च यांची तोंडमेळणी करण्याची जबाबदारी आमच्यावरच पडली ह्मणजे पैसा उभारावा कसा व तो खर्च करावा कसा याचा विचार आमचा आह्मीं उत्तम करूं. या कामांत कांहीं चुका घडल्या तरी त्यांचे परिणाम भोगीत भोगीत आह्मीं शहाणे होऊं. दुसऱ्यानें आमचीं कामें कितीही चांगलीं केलीं तरी नकोत; तीं आमचीं आह्मीं वेडींवांकडीं करण्यांत जी शोभा व जें अंतिम हित आहे तें तीं दुसऱ्यांनीं केलेल्यांत नाहीं. शिवाय तशीं वेडींवांकडीं करून चुकण्याचा व त्या मार्गानेंच शहाणपणा मिळवून सुधरत जाण्याचा आमचा हक्क आहे. या गोष्टी स्पष्ट समजून त्या प्रतिपादण्याचें सामर्थ्य लोकांच्या अंगीं येणें हें काम लोकशिक्षणाशिवाय होणार नाहीं. हें शिक्षणाचें काम ज्याच्या हातांत असेल तो देशांत सत्ताधारी होईल. लोकांच्या बुद्धीस हल्लींची आहे ही स्थिति इंद्रभुवनासारखी आहे असें वाटूं लावणें शक्य असल्यास, तें प्रस्तुत राज्यकर्ते करितील, आजवर करीत आले आहेत. परंतु हा ग्रह लोकांत माजून राहणें आपल्यास इष्ट नसेल तर हें लोकशिक्षणाचें कार्य आपण आपल्या हातीं घेतलें पाहिजे. स्वदेशी चळवळ ह्मणजे राष्ट्रांची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचा उत्तम उपाय. परंतु दुःशिक्षणामुळें किती तरी लोकांच्या मनांत स्वदेशीसंबंधानें जो पीळ पडावयास पाहिजे तो पडत नाहीं, परकीय सरकारासदेखील या चळवळीच्या विरुद्ध साक्षात् बोलवेना; पण आमचेच कित्येक भ्याड झालेले लोक स्वदेशीच्या विरुद्ध वर्तन करितात. पण सभा, प्रदर्शनें वगैरे लोकजागृतीच्या उपायांनीं स्वदेशी चळवळ जितकी

यशस्वी होईल, त्यापेक्षां स्वदेशी शिक्षणाच्यायोगानें पंधरा वीस वर्षांत ती अत्यंत यशस्वी होईल. तसें शिक्षण सरकारकडून मिळण्याचा बिलकुल संभव नाहीं. लोकांनीं करून दाखविल्यावर कदाचित् **"सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः"** या न्यायानें व आणखी कांहीं धूर्तपणाच्या उद्देशांनीं या स्वदेशी शिक्षणासही सरकार सर्वप्रकारें सहाय्य करील. परंतु आज हा बोजा निव्वळ राष्ट्रांतील सुजाण लोकांनींच उचलला पाहिजे. लोकमताचा पाठिंबा पुढारी लोकांस नाहीं, किंबहुना लोकमतच नाहीं असा आक्षेप सरकार आणतें, तर त्यांस शिक्षण देऊन सुविचारी करा, असा त्यांचेपुढें सारखा आक्रोश करीत असतां ते मनावर घेत नाहींत. आतां आमचा विचार आह्मांला पाहिला पाहिजे. गुराख्यांनीं गुरें सोडिलीं तरी यजमानाला त्यांची निगा केली पाहिजे. या लोकशिक्षणाच्या कामास व तें काम आपल्या राष्ट्रीय उत्कर्षास अवश्य अशा रीतीनें करण्यास जर आपण झटलों नाहीं तर राष्ट्रसंक्षयाचें खापर आपल्या माथीं फुटणार असें आजकाल हयात असलेल्या आपणांस समंजस मानणाऱ्या लोकांनीं पक्कें समजलें पाहिजे. आपल्या लोकांत परस्पर बोलतांना आडपडदा ठेवण्याचें कारण नाहीं. राज्यकर्त्यांशीं बोलतांनासुद्धां उघड सत्य बोलण्यांतच खरें चातुर्य आहे. ताकाला जाऊन तपेली दडविण्याचे दिवस गेले; सरळ बोलून सरकाराजवळ हक्कानें दाद मागण्याचे दिवस आले आहेत. लोकांस सरकाराचें ह्मणणें व वागणें कसें आहे व कसें असलें पाहिजे, सरकारचीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या कोणत्या आहेत, प्रजेचीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या कोणत्या आहेत या सर्व गोष्टींची यथास्थित मांडणी करून आपल्या देशबांधवांस आपल्या राष्ट्रांत मान्यतेनें राहण्याची योग्यता

आणून देणारा लोकशिक्षकवर्ग तयार होणें जरूर आहे. सारांश वेदशास्त्रांत ह्मटल्याप्रमाणें आत्मज्ञान सर्व राष्ट्रांत झालें पाहिजे. या कामासाठीं शिक्षणाच्या संस्था नवीन तऱ्हेच्या असल्या पाहिजेत. हें ज्ञान अर्थात् उच्च शिक्षणाच्या विद्यालयांतून विशेषतः मिळण्याजोगें असतें; परंतु तशा प्रकारच्या उच्च संस्थांमध्यें प्रवेश होण्यास अंगीं पात्रता आणून देणाऱ्या पूर्व शाळा अस्तित्वांत येणें अत्यंत अगत्याचें आहे. उदात्त शिक्षणाच्या उच्चतम पायरीचे लोक तयार करण्यास राष्ट्रीय विश्वविद्यापीठाचीच स्थापना झाली पाहिजे. त्या मोठ्या प्रमाणावरील उद्योगाची पूर्व तयारी ह्मणून दुय्यम शाळांची स्थापना जागोजाग झाली पाहिजे. पांचशें किंवा त्याहून कमी लोकसंख्येच्या खेड्यांमध्यें एक प्राथमिक शिक्षण ( ह्मणजे स्वभाषेंत लेखन, वाचन व गणित ) मिळण्याची सोय व्हावी ह्मणून लहान बालशाला स्थापन झाल्याच पाहिजेत. दोन हजार लोकसंख्येच्या गांवांत एक मोठी बालशाला पाहिजे. दहा हजार लोकसंख्येच्या शहरांत अनेक मोठ्या बालशाला असून शिवाय दुय्यम शाळा स्थापिली पाहिजे. यापुढच्या लोकसंख्येच्या नगरांत अनेक मोठ्या बालशाला व दुय्यमशाळा असावयास पाहिजेत, अशाच नगरांत विश्वविद्यापीठीय पाठशाळा असणें भाग आहे. याहून मोठ्या पत्तनामध्यें सर्वप्रकारच्या शाला, व अनेक पाठशाला असावयास पाहिजे आहेत. सरकारच्या हातून आज दीडशें वर्षांत हें जाळें पसरणें झालें नाहीं. सर्व लोकांस लिहितां वाचतां येण्यास भाग पाडण्याचें सरकारानें मनावर घेतलें असतें तर झालें नसतें असें कोण ह्मणूं शकेल ? परंतु ग्रेटब्रिटनमध्यें ज्या गोष्टी सरकार आनंदानें करते किंवा वसाहतवाल्यालोकांस ज्या गोष्टी आपल्या प्रदेशांत

करण्याची मुभा सरकारनें ठेविली आहे, त्या गोष्टी हिंदुस्थानांत झाल्या नाहींत याबद्दल नुसता खेद करीत बसण्याची आज आपणांस सोय नाहीं. आपला गाडा आपणच ओढला पाहिजे. तो खडकावर आपटला तरी त्याची तोडजोड आपणच केली पाहिजे. बहुत कालपर्यंत आपण दुसऱ्यावर अवलंबून राहिलों त्यापासूनही अगदीं नुकसान झालें असें ह्मणण्यास आह्मीं तयार नाहीं. आमच्या मनांत सरकारानें जेवढें काम करावयास पाहिजे होतें, तेवढें व त्या प्रकारचें केलें नाहीं तरी परकीय अमलाखालीं राहिलेल्या लोकांना त्यांनीं इतकें तरी ज्ञानामृत पाजिलें हे सुद्धां त्यांचे सामान्य उपकार झाले आहेत असें ह्मणण्याचें कारण नाहीं. दिलेल्या शिक्षणांतील ढोबळ चुका व त्या शिक्षणांत राहिलेल्या भयंकर व्यंगांमुळें झालेली हानि याच शिक्षणानें आमच्या लक्षांत आली आहे. यासाठीं हानिबद्दल शिव्याशाप देत बसण्यापेक्षां पुढील आपल्या दृष्टीप्रमाणें निर्दोष मार्गाचें अवलंबन एकदम करावें यांतच शहाणपण आहे. देशांतून होणारें उत्पन्न अमकें, त्या मानानें शिक्षणावर होणारा खर्च अमक्या प्रमाणाचा आहे, इतर राष्ट्रांत हें प्रमाण आमच्या प्रमाणापेक्षां कितीतरीपट जास्ती आहे, हें दाखवून सरकारास लाजविण्यास त्यांच्याजवळ हे आंकडे नाहींत कीं काय? बोलण्याप्रमाणें कृति नाहीं हें माप पदरांत घालून सरकारचे कान पिळणारें पार्लमेंट आहे, त्याच्या पुढें ओरडण्यास कांहीं माणसें वाहून दिलीं ह्मणजे तो भाग आटपला, असें समजून आपण अंतर्निरीक्षणास किंवा आत्मपरीक्षणास लागावें हाच एक मार्ग आज उरला आहे. सरकारची कोंडी फोडण्यास दोन तीन गडी लाऊन दिले ह्मणजे बाकीचा खेळ आपला आपण तडीस न्यावा हेंच बरें.

कोंडी फुटून लाभ झाला तर ठीकच; निदान कोंडी फोडण्याच्या नादानें आमच्या गड्यांनीं मार खाल्ला नाहीं ह्मणजे आह्मांस बस्स आहे. आमच्या गड्यांनीं कोंडीवाल्यास चार घटका दमविलें एवढीच फुशारकी प्रस्तुतच्या बिकट काळांत कांहीं कमी आहे असें मानण्याचें कारण नाहीं.

आमच्या स्वतःच्या राष्ट्रांत अशिक्षित, सुशिक्षित, श्रीमंत व गरीब असे लोक आहेत. इतर राष्ट्रांत श्रीमंत व गरीब लोक आपआपल्या राष्ट्राच्या राष्ट्रीय स्थितीसंबंधानें सुशिक्षितच असतात, यादृष्टीनें पहातां त्यांच्यांत अशिक्षित लोक नसतातच असें ह्मणण्यास हरकत नाहीं. यामुळें स्वराष्ट्राभिमान त्यांच्यांत उज्ज्वल असतो व राष्ट्रहिताच्या कोणच्याही कामीं मनुष्यबळाची किंवा द्रव्यबळाची त्यांच्यामध्यें कधींही वाण पडत नाहीं. आमच्यामध्यें हें प्रकरण फार निराशाजनक आहे. दीर्घ परदास्यामुळें स्वाभिमान लुप्तप्राय झाला आहे. संघशक्तीनें कार्यें उठविण्यास लागणारा परस्पर विश्वास नाहींसा झाला आहे. आपल्या जवळच्या लोकांसाठींसुद्धां स्वार्थत्याग करण्याची बुद्धि कोठें फारशी उरली नाहीं. आपल्या कुटुंबापलीकडे दुसरें कांहीं रक्षण करण्यासारखें किंवा वाढविण्यासारखें आहे असें वाटत नाहीं. अशा स्थितींत व्यापक राष्ट्रीय प्रश्नाचा विचार करणारे लोक पुढें येत नाहींत. जे थोडे पुढें येतात त्यांस मिळावें तसें सहाय्य मिळत नाहीं. अशा रीतीनें आपला दाम खोटा, मग राज्यकर्त्यांस किंवा दुसऱ्या कोणास तरी काय बोल लावावा? इंग्रज लोक ह्मणजे कांहीं देव किंवा ऋषि नव्हेत. केवळ परोपकार करण्यासाठीं त्यांचा अवतार नाहीं. त्यांना आपलें राष्ट्र आहे. तें राष्ट्र वाढत्या लोकसंख्येचें आहे. त्या राष्ट्रांतील तरुण व होतकरू

लोकांची सोय लावून इंग्रजी राज्याचा विस्तार वाढवावा व जगांत त्याचा लौकिक व्हावा अशी त्या राष्ट्राची महत्त्वाकांक्षा असणें साहजिक आहे. आपण जगांत सर्व लोकांची सुधारणा करण्यासाठीं देश काबीज करितों, आपली भाषा, आपली संस्कृति, आपलें सामर्थ्य व आपले सर्व सद्गुण दुसऱ्या लोकांना अनुकरणीय आहेत, ह्मणून हिंदुस्थानासारख्या अफाट देशांत येऊन त्यांस त्या सर्वांचा लाभ आह्मीं देत आहों असें त्यांच्या ह्मणण्यांत येतें. "तुह्मीं कोणत्या दुःस्थितींत होतां, तुमचे पूर्वींचे राजे किती कुमार्गानें चालत होते, जागोजाग चोर, दरवडेखोर यांचा सुळसुळाट होता, दुष्काळ आला ह्मणजे लोक पटापट मरत होते, त्यांना धान्याचा पुरवठा दुरून भराभर होण्यास आतांसारख्या सोयी नव्हत्या, याचा विचार करा; तुह्मीं कधींही एकराष्ट्र नव्हतां, अजूनही नाहीं आहां. तेव्हां इंग्लंड, फ्रान्स, इटलीप्रमाणें राजकीय हक्क मिळून तुमचें निराळें स्वतंत्र राज्य व्हावें अशी जरी आमची इच्छा आहे तरी तसें होण्यास तुमच्या विविध जातिधर्मांची अडचण आहे, ह्मणून तुमच्या देशांत शांतता व सुव्यवस्था राखण्यास आह्मीं झटत आहों." अशा प्रकारच्या गोड भाषणांतील विचार ऐकून आमच्यापैकीं कित्येक लोक, स्वदेशोत्कर्षाचे स्वतंत्र प्रयत्न कांहीं शक्य नाहींत, राज्यकर्त्यांच्या नादानेंच चाललें पाहिजे, तिकडचाच शिक्षणक्रम व राज्यव्यवस्थेचा क्रम आपणांस हितावह होईल ह्मणून प्रतिपादन करतात. वस्तुतः गोष्ट तशी नाहीं. नैतिक व सामाजिक आचार आपआपल्या राष्ट्रांत उत्क्रांत होतील तसेच ते हितावह होतील. या बाबतींत शिक्षणक्रम आपल्या राष्ट्रांत जो पूर्वीं होता तोच आपल्या बदललेल्या स्थितींत थोड्या फार फेरफारानें उपयोगी पडेल. आमचे राजकीय प्रश्न

आह्मींच उलगडावेत हेंच योग्य आहे. त्यांत वादाचीं रणें पडलीं तरी हरकत नाहीं. फक्त ब्रिटिशसाम्राज्याचें सूत्र सर्वांस सारखेंच असलें ह्मणजे अंतर्व्यवस्थेंत इंग्रजांनीं किंवा पार्लमेंटानेंही हात घालण्याचें कारण नाहीं. आमच्या गांवांतच एका घरांत तीन भावांचा कांहीं लढा असला तर त्यांनीं बोलावून ऐकटपत्र ह्मणजे तुह्मीं निकाल द्याल त्याप्रमाणें आह्मीं वागूं असें कबुलीपत्र दिल्याशिवाय एखादा माणूस मी तुमचें सर्व आपल्या हवाली करून घेतलें आहे, मी मालक व न्यायाधीश होऊन तंटा तोडतों असें ह्मणेल तर त्याचें कोणी ऐकेल काय ? परंतु आमच्यांतील कित्येक सुशिक्षित ह्मणविणारांना आपला आपण विचार करण्याची कल्पना अशक्य व अप्रयोजक वाटते. साम्राज्यांत राहणाऱ्या वसाहतीला जसें आपलें अंतःस्वातंत्र्य आहे तसें आह्मां भारतवासीयांस पाहिजे आहे. परंतु हें दृढनिश्चयानें मागण्यास सर्व राष्ट्रानें एकदिलानें ओरडावयास व त्यासाठीं झगडावयास पाहिजे आहे. ही समजूत राष्ट्रांतील सर्व लोकांची झाली पाहिजेच. परंतु विहिरींत असेल तर पोहऱ्यांत येईल कीं नाहीं ? आजपर्यंत सुशिक्षित ह्मणून तयार झालेल्या लोकांतच ह्या कल्पना मनांत आल्याबरोबर दाबून टाकण्याची प्रवृत्ति झाली असल्यानें त्यांच्या हातून तरुण पिढीचें शिक्षण नवीन तऱ्हेचें कसें होणार ? तेव्हां या सुशिक्षित सधन माणसांकडून जर राष्ट्रहित व्हावयाचें असेल तर त्यांच्या डोळ्यावरील पटल नाहींसें झालें पाहिजे. तसें दूर झाल्यावरच त्यांचें नवीन तऱ्हेच्या ह्मणजे राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनांस सहाय्य मिळणार. एरवीं चेंबर्स शॉर्ट स्टोरीज्, मॉरल क्लासबुक, बुक् ऑफ गोल्डन डीड्स, मराया एजवर्थ्स मॉरल टेल्स्, सँडफर्ड अँड मर्टन, विकर ऑफ वेकफील्ड असल्याच

पुस्तकांतून विद्यार्थ्यांचें नीतिशिक्षण झालें पाहिजे ही चिकाटी सुटणार कशानें? रामायण, महाभारतांत सर्व जगास पुरे इतकें नीतिशिक्षण आहे ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. आमचा इतिहास आह्मांस सांगतो कीं, आमच्यामध्यें मोठमोठे राष्ट्राभिमानी वीर उदयास आले. धर्माबद्दल, देशाबद्दल व स्वराज्याबद्दल ओतप्रोत अभिमान असलेले मुत्सद्दी व शूर पुरुष भरतभूमीस भूषित करिते झाले, असें असून खरा देशाभिमान ही कल्पना आपणांस नवीनच आहे, ती आपण पाश्चात्यांपासूनच शिकलों आहों असा ग्रह आमच्यांतील कांहीं मंडळींचा आहे तो जाणें जरूर आहे. श्रीसमर्थ ह्मणतात त्याप्रमाणें '**जुनें ठेवणें मीपणें तें कळेना**' अशी स्थिति झाली आहे. ती जाईल तेव्हां त्या ठेवण्याचा लाभ आपल्या पुढील पिढीस करून देण्यासाठीं जे कोणी प्रयत्न करतील त्यांस द्रव्यबलाची व माणूसबलाची उणीव पडणार नाहीं.

खुद्द इंग्लंड देशांत सर नॉर्मन लॉकीयर सारखे जाडे विद्वान् ह्मणत आहेत कीं, शिक्षणाचा प्रश्न सर्वांत महत्त्वाचा आहे आणि आमच्या या देशांत माणशीं दीड आणासुद्धां शिक्षणाच्या कामीं खर्च होत नाहीं. येथें शिक्षणाची काय व्यवस्था आहे इकडे कोण बघतो काय? विश्वासानें विलायत सरकारचे मांडीवर मान ठेऊन आह्मीं स्वस्थ निजलों त्याचा परिणाम काय झाला आहे तो दिसतच आहे. अज्ञान व देवभोळेपणा, स्वावमानित्व व परावलंबित्व, हताशत्व व हृदयदौर्बल्य यांचें साम्राज्य माजून राहिलें आहे. याचें कारण सरकारनें आपल्यावरील जबाबदारी ओळखलीच नाहीं. मग बजावण्याचें काम दूरच राहिलें. अत्यंत सरळपणानें या गोष्टीचा विचार करणारे लोक असेंच ह्मणतात. परंतु इंग्लंडच्या व्यापाराभि-

वृद्धीसाठीं व तेथील लोकांच्या शिक्षणासाठीं जे प्रयत्न सरकारानें केले ते पाहून निवळ अजाणपणा किंवा बेपर्वाई याहून अधिक दोषास्पद कारण हिंदुस्थानास सांप्रतच्या दुःस्थितींत राहूं देण्यास झालें आहे असेंही कांहीं लोकांच्या मनांत आलें तर नवल नाहीं. क्षुद्रबुद्धीनें किंवा मत्सरानें हिंदुस्थानास अवनतींतच राहूं देण्यांत आपलें हित आहे असें वाटून इकडे पुरवावें तितकें लक्ष बुद्धिपुरःसर दिलें नाहीं असें वाटून कित्येक लोक मि० दादाभाई वगैरे लोकांप्रमाणें इंग्रजी राज्यानें आमचें कांहीं हित झालें आहे असें ह्मणण्यास देखील अनमान करीत असतात. त्यांतही कांहीं अर्थ नाहीं असें आह्मांस ह्मणवत नाहीं. सारांश इतउत्तर या गोष्टीची उपेक्षा करणें आणि पुनःपुनः सरकारच्या तोंडाकडे आशापूर्ण नयनांनीं पहाणें ह्मणजे प्रेतास जीव येईल अशी आशा करून राहण्यापैकींच आहे.

राष्ट्रीय शिक्षण ह्मणजे काय हें देखील आमच्यापैकीं कित्येकांस पुरें कळलें नाहीं यांत आह्मांस आश्चर्य वाटत नाहीं. हिंदुस्थानास राष्ट्रीयत्व आहे काय असाच ज्यांना संशय वाटतो त्यांच्याही वाटेस जाऊन त्यांच्या मतीचा कलंकही झाडला पाहिजे. हिंदु, मुसलमान, पार्शी व एतद्देशीय ख्रिती ह्या सर्वांचें हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहे, तें नवीन बनवावयाचें किंवा बनावयाचें आहे असा भ्रम बाळगण्याचें बिलकुल कारण नाहीं. एकराष्ट्रत्वास लागणाऱ्या गोष्टी हिंदुस्थानांत आहेत ह्मणूनच आज २१ वर्षें राष्ट्रीय सभा चालली आहे. कांहीं मूढ किंवा पढतमूढ लोक आहेत त्यांस प्रसंगविशेषीं झालेल्या हिंदुमुसलमानांच्या बेबनावामुळें व क्वचित् वेळेनुसार झालेल्या परस्परांच्या डोकीफोडीमुळें हिंदुस्थानच्या एकराष्ट्रत्वाबद्दल संदेह

वाटतो व हेच लोक कित्येक आपमतलबी इंग्रजांप्रमाणें हिंदुस्थान एकराष्ट्र कधींच होणार नाहीं असें प्रतिपादूं लागतात. आमच्या मतें या बोलण्यांत अर्थ नाहीं. जो जो या भूमीस आपली जन्मभूमी ह्मणतो, तो तो या राष्ट्राचा अवयव. एका मोठ्या वाड्यांत जितकीं बिऱ्हाडें राहतात तितक्यांचा तो वाडा. तितक्यांचे हितसंबंध एक आलेच ह्मणून समजावें. आतां बाहेरून कोणी येऊन कलहाचें बीज पेरणारा भेटला तर त्यांचे कायमचे संबंध थोडेच तुटणार आहेत! परोपदेशानें हें वितुष्ट उद्भवलें नाहीं तरी आपआपल्या कमसमजुतीनेंही एकमेकांस आपण पाण्यांत पाहतों; परंतु ते प्रसंग अगदीं तात्पुरते. एका पिढीला भांडण होईल तर दुसऱ्या पिढीला सलोखा होईल. एका गोष्टींत वैमनस्य आलें तर दुसरी एक अशी गोष्ट उद्भवते कीं, तिच्यायोगें सौमनस्य पुनः स्थापित होतें. अशा कालवशात् उपस्थित झालेल्या वादावरून जर एकराष्ट्रत्व नष्ट झालें तर दोन सखे भाऊ कोर्टांत तंटा खेळणारे व एकमेकांशीं अगदीं अबोला धरणारे असतात ह्मणून त्यांचें एककुटुंबत्वही नष्ट झालेंच पाहिजे. एका गांवांत रहाणारे, एका घराची वांटणी आपआपसांत करून वावरणारे, एका जमिनीच्या तुकड्याचे तुकडे करून कष्टमशागत करून उपजीविका करणारे लोक एकाच हिताहितसंबंधानें जखडले जातात हें सांगावयास एक पोर पुरें आहे. परंतु परप्रत्ययनेयबुद्धि अशा माणसांची संख्या वाढूं लागल्यानें व बुद्धिभ्रंशाचीं स्पष्ट चिन्हें दिसून आल्यानें साध्या सरळ गोष्टीसुद्धां मोठ्या गंभीरपणानें प्रतिपादण्याचा प्रसंग येतो. ह्मणून मि० रसूल साहेबांना आपल्या धर्मबंधूंना कंठरवानें सांगावें लागलें ‘अहो मुसलमान लोकहो, तुह्मांला या भरतभूमींत रहावयाचें आहे, इराण, अरब-

स्थान किंवा तुर्कस्थानांत जावयाचें नाहीं, ही भरतभूमीच तुमची जन्मभूमि आहे, ह्मणून तुह्मांस आपले राष्ट्रबंधु हिंदूंपासून अलग रहातां यावयाचें नाहीं.' हीच गोष्ट पार्शीची व हीच येथील ख्रिस्ती लोकांची. या सर्वांनीं मिळून राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न हातीं घेतला पाहिजे. एक तत्त्व पुढें ठेऊन शिक्षणाच्या संस्था स्थानिक परिस्थितीप्रमाणें भिन्न भिन्न प्रकारच्या असल्या तरी हरकत नाहीं. राष्ट्राच्यासंबंधानें विचार करितांना आपण सर्व एकजीव आहों असें मानून त्याप्रमाणें वर्तन करण्यास तयार राहूं असें धोरण राखून निरनिराळ्या धर्माच्या लोकांनीं आपआपल्या सोयीप्रमाणें प्रयत्न केले तरी हरकत नाहीं. फक्त धर्माचे व जातीचे संबंध येतील तेवढे खेरीजकरून बाकी सर्व गोष्टींचा फायदा सर्वांस सारखा मिळाला ह्मणजे झालें.

असें धोरण ठेऊन मुसलमान लोकांनीं आपल्या अलीगड कॉलेजची स्थापना केली आहे व तेंच धोरण भारतीय विश्वविद्यालय स्थापन करूं पाहणाऱ्यांच्या मनांत आहे. त्या विश्वविद्यालयाची पूर्व तयारी व्हावी ह्मणून सर्व देशभर त्या धोरणाच्या दुय्यम शाळा झाल्या पाहिजेत असा विचार मनांत आणून '**समर्थविद्यालय**' नांवाची दुय्यम शाळा तळेगांव दाभाडे येथें उघडण्यांत आली आहे, ह्या शाळेंत मुसलमान, ख्रिस्ती, पार्शी यांचा प्रवेश होण्यास कोणचीच नड नाहीं, परंतु मुख्यत्वेंकरून हिंदुलोकांच्याच रीतीभाती व धर्म यांच्याकडे लक्ष ठेऊन बहुतेक व्यवस्था करण्यांत येते. शाळेंत नेमलीं जाणारीं वाचनपुस्तकें व दिल्या जाणाऱ्या सुट्या व केला जाणारा धर्मनीतिन्यायाचा बहुतेक उपदेश आर्य सनातनधर्मास अनुसरून असावयाचा. यांत राष्ट्रीयपणा राखिला जाईल. त्यावरून असें

सिद्ध होईल कीं, पाश्चात्त्य किंवा इतर कोणत्याही लोकांपासून मिळण्याजोग्या शिक्षणापासून हट्टानें किंवा दुरभिमानानें पराङ्मुख न होतां आपल्या घरींच असलेल्या साधनांचा पूर्ण उपयोग करून घेण्याकडे चालकांचें विशेष लक्ष आहे.

या दृष्टीनें पहातां समर्थविद्यालयाचा पहिला विशेष हा कीं त्यांतील **सर्व विद्यार्थी ब्रह्मचारीच पाहिजेत.** बाकीचे श्रुतिस्मृतिपुराणोक्त ब्रह्मचर्याचे सर्व आचार यथास्थित पाळणें शक्य नसलें तरी त्यांपैकीं पहिली व अत्यंत महत्त्वाची गोष्ट अविवाहित स्थिति, तिचा पूर्ण स्वीकार केला आहे. बालविवाहाची दुष्ट चाल आपणांत रूढ झाली आहे ह्मणून व्याख्यानें देणें किंवा बालविवाहाविरुद्ध शपथा व सह्या घेऊन समाज बनविणें किंवा इतर प्रकारांनीं चळवळ करणें यापेक्षां मुलामुलींच्या शाळाच अशा निघाव्यात कीं ज्यांत विवाहित विद्यार्थ्यांचा प्रवेशच व्हावयाचा नाहीं. अशा प्रकारच्या पूर्वीं सूचना न करितां कडक नियम केल्याबरोबर लोक खडबडून जागे झाल्यासारखे झाले आहेत. कित्येक वर्षांच्या चळवळीनें जें अंजन डोळ्यांत पडलें नाहीं तें एकदम पडल्यासारखें झालें आहे. कोणाचीही मदत न घेतां शाळा काढण्याची तयारी केल्याबरोबर लोकांत इतकी जागृति झाली आहे व आपल्या मुलांचीं किंवा पोष्यांचीं लग्नें करून टाकल्याबद्दल पश्चात्ताप झाला आहे. तर हेंच काम सरकाराच्या शाळांतून योग्य नियम व आगाऊ सूचना देऊन करण्यांत आलें असतें तर किती बहार झाली असती असें आह्मांस वाटूं लागलें आहे. सरकारावर जी जबाबदारी आहे ती आह्मांवर नसल्याकारणानें आह्मीं एकदम प्रथमच नियम करून टाकिला व त्याची कडक अम्म-

लबजावणी सुरू केली. आमची शाळा निघण्यापूर्वीं ज्यांचा विवाह झाला आहे अशा मुलांना व त्यांच्या पालकांना आमच्या शाळेचा मार्ग सोडावा लागल्याबद्दल मनापासून वाईट वाटत आहे हें आह्मीं जाणून आहों व त्याबद्दल आह्मांसहि दिलगिरी वाटते. आमच्या शिक्षणक्रमावर व शिक्षणपद्धतींवर परिपूर्ण विश्वास असून ज्यांची अशा तऱ्हेनें निराशा होत आहे त्यांच्याबद्दल खेद वाटूनही आजच्या स्थितींत आमचा नाइलाज आहे. विवाहित व अविवाहित विद्यार्थी एकाच ठिकाणीं ठेवून त्यांचेकडून विद्याभ्यास करविण्याची आमची इच्छा नाहीं. आमची शाळा निघण्यापूर्वींच आमच्यासारखे विचार मनांत येऊन ज्यांनीं आपल्या मुलांना विवाहपाशांत जखडून टाकलें नाहीं त्यांनाच त्या दूरदृष्टीच्या विचाराचें फळ मिळावें यांत आह्मांस संतोष व आनंद वाटतो. शिवाय आज जी लोकांची निराशा होत आहे तिचा परिणाम आमच्या दृढ निश्चयामुळें समाजावर जितका पूर्ण व स्पष्ट होईल तितका आह्मीं थोडा मऊपणा दाखवून कांहीं अटींवर विवाहितांचा प्रवेश करण्यानें होणार नाहीं. यासाठीं "विवाहित' ह्मटल्याबरोबर प्रवेश नाहीं असा निग्रह धारण करणें व तसेंच मध्यंतरीं विवाह केल्यास शाळा सोडावी लागेल असें स्वच्छ बजावणें यापासूनच एकंदरींत हित आहे असा आमचा समज आहे. ज्या मुलांना व पालकांना आमच्या विद्यालयाविषयीं आदरबुद्धि असेल तीं मुलें व ते पालक शीघ्रविवाहाच्या उलट होतील. अमक्या शाळेंत प्रवेश होणार नाहीं ह्मणून माझें लग्न करूं नका असा हट्ट घेण्यानें सुद्धां कित्येक आईबाप व पालक यांचा निरुपाय होईल. अशी योग्यता आमच्या संस्थांची होणें हें सर्व पुढील यशापयशावर आहे. त्याबद्दल शेखमहमदी करीत बसण्याचा हा प्रसंग

नव्हे. तथापि खुद्द मुलांच्या कोमल मनावर एक प्रकारचा ठसा उत्पन्न होतो व त्याचाही एखाद्या चळवळीस मोठा उपयोग होतो असा स्वदेशी चळवळीपासून अनुभव आला आहे. स्वदेशी कपडे घेण्याच्या, स्वदेशीहून इतर साखर न वापरण्याच्या किंबहुना हरतऱ्हेचा स्वदेशीच माल वापरण्याच्या हट्टावरून कित्येक कुटुंबांत वडिल माणसांच्या अर्ध्यामुर्ध्या निश्चयास किंवा पूर्ण विरोधास लज्जा उत्पन्न होऊन तीं कुटुंबें पूर्ण स्वदेशी झालीं आहेत. हाच प्रकार स्वदेशी विद्यालयांचा होऊन आमच्यांतील बालविवाहाची अनिष्ट चाल मोडण्यास सहाय होईल असा आशांकुर आमच्या दृढनिश्चयामुळें आमच्या मनांत उद्भवला आहे. निवळ मुलांच्या मनोविकारांपासून इतकें कार्य होण्याचा संभव असेल तर सारासार विचार करण्यास समर्थ असलेल्या प्रबुद्ध मातापितरांनीं व पालकांनीं या गोष्टीचें शांतपणें मनन केल्यास केवढी बहार होईल व राष्ट्रामध्यें केवढा नवीन जोम आणल्याचें श्रेय ते घेतील? हल्लीं या बाबतींत बरीच जागृति झाली आहे, तरी चांगलीं चांगलीं सुजाण माणसेंही विचारतात "काय हो तुह्मीं ही अट मोठी बिकट ठेविली आहे. यांत तुमचा काय मतलब आहे? असें कां करितां? यामुळें कित्येक मुलांना तुमच्या शाळेंत यावयास नड येईल?" अशा लोकांस आजन्म ब्रह्मचारी राहिलेल्या भीष्माचार्य, मारुति वगैरेंच्या बळाची आठवण देणें भाग पडतें. भीमार्जुनासारखे कट्टे वीर पण भीष्मापुढें काय त्यांचा पाड? भीष्माचार्याबद्दल तर खुद्द भगवंतास भग्नप्रतिज्ञ व्हावें लागलें व त्याच्या पायावर द्रौपदीस घालून तिच्याकडून प्रकारांतरानें नवऱ्यास जीवदान मागविलें. परंतु हे अपवाद सोडून दिले तरी आपल्यांतील प्राचीन काळची सररहा पद्धति हीच; ह्मणजे

यावदध्ययन ब्रह्मचर्य पाळून नंतर समावर्तन (सोडमुंज) व गृहस्थाश्रम. या गोष्टीचें इतकें विस्मरण पडावें कीं तिचें पुनरुज्जीवन करूं पहाणारांच्या प्रयत्नानें विस्मित होण्यापर्यंत लोकांची विचारावनति यावी! यामुळें खेद वाटतो. दुसरी गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे ती तरी स्पष्ट पहावी कीं नाहीं? परंतु आपल्या या सांप्रतच्या स्थितींत दुसऱ्याच्या वाईट गोष्टींबद्दल लांब जीभ करून वाटेल तशी टीका करण्यांत आह्मीं तरबेज आहों; परंतु त्यांच्यांतील अनुकरणीय गोष्टींकडे पूर्ण दुर्लक्ष करितों. हल्लीं ब्रह्मचर्य पाळून अध्ययन करणारे आमच्या राज्यकर्त्यांपैकीं सगळे आहेत. सर्व विद्याक्रम परिपूर्ण होऊन पोटापाण्याची सुरेख सोय झाल्याखेरीज इंग्रजलोक विवाहाचा विचार करीत नाहींत. त्यांच्यांतील मुलाबाळांची वाढ पाहून तरी आह्मीं कांहीं बोध घेऊं नये काय? अविवाहित स्थितींत विद्याक्रम पूर्ण झाल्याकारणानें त्यांना सर्व पृथ्वीतलावर कोणत्या पाहिजे त्या देशांत उद्योगधंद्यासाठीं जाण्यास भीति वाटत नाहीं. अशा प्रकारचे परिणाम आमच्या समाजांत दिसून येण्यास आह्मीं समर्थविद्यालयांत सुरू केलेल्या क्रमाचें अवलंबन सतत ५० वर्षें तरी चाललें पाहिजे. या विषयावर निबंधरूपानें पूर्ण विवेचन करण्याचें हें स्थल नव्हे; ह्मणून आमच्या शाळेचा पहिला विशेष जो ब्रह्मचर्यनिर्बंध त्याविषयीं इतकेंच लिहिणें बस्स आहे.

दुसरी निश्चयाची गोष्ट आह्मीं अमलांत आणूं इच्छितों ती ही कीं दुय्यम शिक्षणाचा प्रारंभ होतां होईल तों उशीरा करावा. हल्लीं मुलाला पुरें बोलावयास येत नाहीं, किंवा ज्याचे त्यास कपडेसुद्धां संभाळण्याचें ज्ञान नसतें तों त्यानें शाळेंत जावें अशी आईबाप किंवा पालक यांची मनापासून इच्छा असते. यामुळें ९ व्या वर्षीच्या प्रा-

रंभापासून क्वचित जरा आधींच मुलाचा ए. बी. सी. ला प्रारंभ होऊन १० व्याच्या आरंभाला मुलगा तिसऱ्या किंवा चवथ्या इयत्तेंत येतो. याहून लवकर कोणी मुलगा शिकेल तर त्याची विशेष वाहवा होते. यायोगें अल्प वयाच्या मुलीला झालेली संतति या शिक्षणाच्या अकालिक ओझ्याखालीं दडपून जाते. ह्मणून हा प्राथमिक शिक्षणाच्या पर्यवसानाचा व दुय्यम शिक्षणाच्या प्रारंभाचा काल पुढें पडावा ह्मणून समर्थविद्यालयांत प्रवेश होणाऱ्या मुलास दहावें वर्ष पूर्ण झालें पाहिजे असें ठरविलें आहे. यायोगें आमच्या शाळेंत येऊं इच्छिणाऱ्या कित्येक पालकांशीं बुद्धिवाद करून त्यांची समजूत पाडावी लागली कीं ही भराभर यत्ता चढविण्याची गोष्ट ह्मणजे शारीरिक दौर्बल्यास आदरानें व प्रेमानें बोलावून आणून त्यांस सुखासमाधानाचें वसतिस्थान करून देण्यासारखी आहे; आपलीं आवडतीं मुलें अकालीं यमसदनाला पाठविण्याची तयारी करून देणेंच होय ही पक्की गांठ मारून ठेवावी. ८।९ व्या वर्षी मुलाच्या काखेंत इंग्रजी दप्तर देणें ह्मणजे त्या घोर प्रवासाची शिदोरी बांधून तीच त्याच्या बरोबर देऊन आपणच त्याला तिकडच्या मार्गावर पोंचविण्यास सिद्ध झाल्याप्रमाणें आहे. दुसऱ्या अनेक अनिष्ट गोष्टी या दुय्यम शिक्षणाच्या प्रांतांत मुलें घुसडून देण्यापासून आपल्या हातून होतात, त्यांचा विचार सोडून दिला तरी हीच एकटी ह्मणजे लहान जीवावर भला मोठा बोजा घालून त्याखालीं त्याला चूर करून टाकण्याची गोष्ट पूर्णपणें आपल्या लोकांच्या मनावर बिंबली तरी केवढें हित होणार आहे हें आह्मीं सांगावयास नको.

शाळेंत मुलें घेतांनाच चांगलीं पाहून घ्यावींत असा चार दोन वर्षांखालीं अमेरिकेंतील एका शाळेच्या चालकांनीं केलेला निश्चय

आमच्या वाचण्यांत आला होता. सशक्त व डोळ्यानें अधू नसलेलीं मुलें शाळेंत घेतलीं ह्मणजे निवळ विद्याभ्यासाचा परिणाम शरीरप्रकृतीवर काय होतो हें पाहतां येईल. हल्लींच शाळेंत येण्यापूर्वी शहरांत सर्व मुलांचे डोळे तपासले तर त्यांपैकीं बरींच मुलें हीनदृष्टीचीं आढळून येतील; ह्मणजे त्यांच्या कुलक्रमागत व्यंगाचें किंवा त्यांच्या मातापितरांच्या व्यंगाचें त्यांच्यामध्यें प्रतिबिंब पडतें. कित्येक वेळां मूळची दृष्टि शाबूत असून बालसंगोपनाच्या कामीं हयगय झाल्यानें कांहीं व्यंगें जडतात; त्यांत थोडाबहुत प्रमाद नेत्रेंद्रियास मिळतो. अशा प्रकारच्या मुलांतून सरसकट मुलें शाळेंत घेतलीं जातात आणि मग ७।८ वर्षें विद्याभ्यास झाला ह्मणजे त्यांच्या दृष्टींतील कमीपणा उदयास आला कीं, विद्येच्या माथ्यावर सर्व खापर फुटावयाचें. वस्तुतः असल्या चोचलेखोरपणानें विद्याभ्यासाचा ज्यास जात्या कंटाळा असतो, अशांस बरेंच फावतें. विद्याभ्यास चांगल्या रीतीनें केला ह्मणजे '**किं न साधयति कल्पलतेव विद्या**' हेंच खरें ठरेल असा आमचा पूर्ण भरंवसा आहे. उत्साहानें विद्याभ्यास जे दिवशीं होईल ते दिवशींची मनाची हुशारी व शरीराचें सामर्थ्य, कांहीं कारणानें वेळ फुकट गेला असेल त्या दिवसाच्या मलूनपणा व औदासीन्याशीं ज्यांनीं ताडून पाहिली असेल त्यांसच आह्मीं ह्मणतों त्याची कल्पना होणार आहे. सहा मैल फिरून येण्याचा व्यायाम व चार पांच तास एकांतवासांत झालेलें निर्वेध वाचन किंवा लेखन जे दिवशीं होईल तो दिवस आनंदाचा; ते दिवशीं झोंप कशी सुरेख येते. पण विद्यार्थिदशेंत देखील असा क्रम होत नाहीं व नियमानें तर होत नाहींच, अशांना परीक्षेच्या अगोदर दोन महिने यंत्रांत जोरानें वाफ भरावी

लागते. अशा पिशाचवृत्तीच्या वर्तनानें विद्यार्थ्यांचें शारीर व बौद्धिक सामर्थ्य खर्ची पडलें ह्मणजे कायावाचामनेंकरून सतत एखाद्या गोष्टीस वाहून घेण्याचें त्यांच्या हातून केव्हांच होत नाहीं. यांत सर्व प्रकारचे लोक येतात. मूळचे अशक्त व मूळचे सशक्त सर्व सांपडतात. या चरकाचा परिणाम सर्वांवर होतो. मूळच्या अशक्तांवर विशेष होतो. ह्या अनुभवसिद्ध गोष्टी पुढें ठेवून समर्थविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे नवीन ह्मणजे खालचे वर्ग लहान ठेऊन प्रत्येक मुलाकडे शिक्षकाचें लक्ष विशेष लागेल अशी योजना आहे. पालकांनीं* घरीं शिक्षक ठेवावयाचा नाहीं असें निक्षून सांगण्यांत येतें. खासगी रीतीनें शाळेंतील धडे शिकून येणारीं मुलें वर्गांत दुर्लक्ष करितात, दुसऱ्या मुलांस बोलवितात किंवा घरच्या पंतोजीनें सांगितलेल्यांत व वर्गशिक्षकानें सांगितलेल्यांत कोठें जरा अंतर पडले तर किंवा खासगी शिक्षकानें एखादी विशेष शिकविलेली गोष्ट वर्गशिक्षकास विचारून ती त्यास वेळीं सांगतां आली नाहीं तर टवाळी करितात. शिवाय, घरून शिकून आल्यानंतर दिलेलीं उत्तरें इतर मुलांपेक्षा अर्थात् वरचढ होऊन त्या मुलास तात्पुरती शाबासकी मिळते. परंतु शिक्षकास खुद्द मुलाच्या बुद्धीची प्रगति किती झाली आहे, स्वतः त्यास अर्थ लावण्याची शक्ति किंवा कोणतीही क्लृप्ति लढविण्याचें कौशल्य किती आहे हें कळण्याचा मार्ग नसतो. यामुळें

* हल्लीं **समर्थविद्यालयांत** घरीं राहून येणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रवेश नसल्यानें गृहशिक्षकाचा प्रश्न उपस्थित होत नाहीं. तरी मुलें सुटींत घरीं गेल्यावर कित्येक पालक त्यांस शिक्षक ठेवितात तो देखील मोड त्यांनीं आवरावा अशी विनंति आहे. वरील विचार पुढें विद्यार्थिगृहव्यवस्थेविषयींचे विचार **समर्थविद्यालय** प्रथम काढलें तरा कांहीं राष्ट्रीय शाळा शहरांत काढाव्या लागतील त्यांस लागू पडतीलच.

घरीं शिक्षक ठेवलेलीं मुलें स्वावलंबी होत नाहींत. कांहीं दिवस उसन्या शहाणपणावर फुशारकी मारून असतात व इतर मुलांपेक्षां आपण उत्तरें चांगलीं देतों ह्मणून फुगतात व पुढें पुढें गृहशिक्षकाची मदत कमी झाल्यावर त्यांची फजिती उडते. एकंदरीनें शाळेंत शिकविल्या जाणाऱ्या गोष्टींबद्दल घरीं शिक्षक ठेवणें चुकीचें आहे.

कित्येक शिक्षक आपलीं कामें हलगरजीपणानें करितात, शाळेंत शिकवीत नाहींत, नुसते प्रश्न विचारून गुण ( मार्क ) देऊन मुलांच्या बुद्धीचा व दुसरीकडून मिळविलेल्या ज्ञानाचा हिशेब ठेवतात. प्रत्येक तासाला व धड्याला आणि विशेषतः नवीन शिकविला जाणारा धडा असला तरी त्यालासुद्धां गुण देऊन त्यांची नोंद ठेवणारे शिक्षक असतात. असल्यांस शिक्षकाचें काम सांगितल्यापेक्षां मुलकी खात्यांत हिशेबी वही लिहिण्यास सांगणें बरें. कांहीं शिकवून मग आपल्या शिक्षणाचा परिणाम काय झाला आहे हें पहाण्यासाठीं परीक्षण करावें लागतें. परंतु त्या परीक्षणाच्या वेळीं विशेषतः तोंडी परीक्षणाचे वेळीं गुण देणें हें ठीक नाहीं. कारण वर्गांत झरझर विचारले जाणारे प्रश्न सारखेच कठीण किंवा सोपे नसतात. त्या वेळचे गुण ह्मणजे सोडतींत मिळालेल्या बक्षिसाप्रमाणें होत. यासाठीं सर्वांस सारखे प्रश्न असतात अशी लेखी परीक्षा घेऊन स्थूल मानानें प्रती लावणें हेंच काय तें खरोखर शक्य असतें. भाषा, इतिहास, भाषांतर, निबंधलेखन, इत्यादि विषयांत अगदीं तंतोतंत गुण देणें अशक्य आहे, निदान फार कठीण आहे. तेव्हां असलें अवघड काम नित्य करण्यांत अर्थ नाहीं. रोज शिकविण्याचें ह्मणजे ज्ञानधन समर्पण करण्याचें उदार कार्य करीत असावे व तें

करतां करतां दिलेला निधि कितपत रक्षण करणारे विद्यार्थी आहेत इतकी चाचपणी करीत करीत हें ज्ञानदान चालवावें, हेंच कायतें खऱ्या व सरळ शिक्षकाचें पहिलें काम होय. त्याचप्रमाणें दिलेल्या द्रव्याची वाढ स्वतः करावयास विद्यार्थी समर्थ होत आहे कीं नाहीं हेंही पहाणें महत्त्वाचें आहे.

बुद्धिशिक्षणाबरोबर शरीरसंवर्धन होत आहे कीं नाहीं हा विचार अवश्यक आहे. तसेंच विद्यासंपन्न होत असतां शिष्य विनयसंपन्नही होत गेला पाहिजे. ह्या सर्व गोष्टी विसंगत नाहींत इतकेंच नाहीं, परंतु शिक्षकाच्या धंद्याला मुख्यत्वेंकरून जर एक गोष्ट अनुकूल असेल तर ती हींच कीं या सर्व गोष्टी परस्परांस पोषक व सहाय्य-कारक आहेत. शरीरसंपत्ति नीट असली ह्मणजे अभ्यास चांगला होतो. अभ्यास चांगला झाला अर्थात् आपलें काम आपण चांगलें केलें असें समाधान वाटलें ह्मणजे मन प्रसन्न होऊन त्याचा शरीराच्या वाढीवर सुपरिणाम होतो. शील चांगलें असेल त्याचीच शरीरसंपत्ति ठीक असते. आणि विशेष अनुभवाची गोष्ट अशी आहे कीं, शरीरसंपन्न मुलाच्या मनांत कुडे विचार येण्याचा संभव कमी असतो. कपटी वर्तन किंवा भ्याडपणा या गोष्टी त्याच्यामध्यें सहसा नसतात. शील व आरोग्य ह्या गोष्टीची अध्ययनास मदत होते. तेव्हां या सर्व गोष्टी ज्यांच्यायोगानें सारख्या वाढत जातील असे उपाय योजणें हें समर्थविद्यालयाचे चालक आपलें अंगीकृत कार्य समजत आहेत.

यासाठीं विद्यार्थ्यांच्या शरीरप्रकृतीकडे व आहारविहाराकडे त्यांना लक्ष पुरविणें भाग आहे. पूर्वींच्या कालीं गुरुकुलांत राहून शिकण्याची जी चाल होती तिची योग्यता शिष्यवर्गाच्या तात्पुरता

संबंध येतो अशा पद्धतीस येणें अशक्य आहे. यासाठीं शहराबाहेर नदीतटाकीं आश्रम बांधून तेथील ओऱ्यांत विद्यार्थ्यांची सोय होऊन सुमारें वीस वर्षें वयास होईपर्यंत विद्याभ्यास होऊं लागेल तेव्हांच समर्थविद्यालयाचा खरा हेतु सिद्धीस जाईल. सात्त्विक वृत्तीनें सर्व कर्मे होण्यास दुसरा उपाय नाहीं. राष्ट्राची स्थिति तर सर्व पालटली आहे. तेव्हां एकदम आज आमच्यासारख्या द्रव्यबलहीनांनीं गुरुकुलासारख्या संस्थांस हात घालणें शक्य नाहीं. तेव्हां शहरांतच शाळा घालून ज्यांचीं घरें असतील त्यांस घरांत राहूं देणें व बाकीच्यांनीं विद्यार्थिवसतिगृहांत* राहिलें पाहिजे असा कडक नियम करणें इतकेंच तूर्त शक्य आहे. तशी पंक्तिव्यवहार्य ब्राह्मणमंडळी-पुरती विद्यार्थिवसतिगृहाची सोय अगोदर केलेली आहे. तेव्हां मुलांच्या राहण्याची सोय नाहीं ह्मणून मुलें पाठविण्यास अनमान करण्याचें कारण नाहीं. इतर जातीचीही सवडीप्रमाणें अशीच सोय करून देण्यांत येईल. या बाबतींत यूरोपीय राष्ट्रांतील एक अनुकरणीय चाल नमूद करण्याजोगी आहे. वि ार्थिवसतिगृहांत ज्यांची सोय होत नाहीं अशा विद्यार्थ्यांचा एखाद्या कुटुंबांत समावेश करण्यांत येतो. गरीब परंतु अब्रदार लोकांस तितकीच द्रव्यदृष्ट्या मदत होते व विद्यार्थ्यांसही चांगला सहवास मिळून त्यांच्या पोटापाण्याची चांगली सोय होते. तिकडे अशीं कुटुंबें आपल्या घरीं एक दोन तीन असे विद्यार्थी घेण्याची सोय करितात. अशा प्रकारें लहान वयाचे

---

*या खंडांतील विचार '**समर्थविद्यालया**'च्या सांप्रतच्या स्थितीस लागू नाहींत. आतां सत्तेची पाहिजे तशी जागा झाल्यानें गुरुकुलाप्रमाणें सर्व विद्यार्थी एकाच ठिकाणीं रहाण्याची व्यवस्था केली आहे. सर्व जातींच्या लोकांची त्यांच्या मर्जीप्रमाणें सोय करण्यांत येईल.

विद्यार्थी मध्यम स्थितींत मास्तर लोकांनीं आपल्या घरांत ठेवून घेतल्यास त्यांच्या घरच्या माणसांवर गृहकृत्याचा बोजा विशष न वाढतां त्यांना थोडी मदत होईल. लहान पगाराचे कारकुनही हेंच करूं शकतील. त्यांत आपल्या घरचीं मुलें असलीं तर विशेषच सोईचें होईल. वस्तुतः यांत कांहीं कमीपणा नाहीं; परंतु लोकापवादास व्यर्थ भिणारे लोक कमी होतील तर ही योजना अनेकदृष्ट्या हितावह होईल. स्वतः नियमितपणानें वागणाऱ्या माणसांचीं हीं कामें आहेत. मुलांवर योग्य रीतीची जरब राहील अशा सद्गृहस्थांची संख्या वाढेल तर समाजासही वळण चांगलें लागेल. जाहिरात देऊन मुलें घेण्यापर्यंत मजल आली नाहीं तरी शाळांच्या व्यवस्थापकांस सांगून ठेवलें तरी ठीक होईल. पत्रव्यवहार करावा किंवा समक्ष भेटावें. असे लोक शाळांच्या व्यवस्थापकांनीं घालून दिलेल्या नियमाप्रमाणें मुलांस वागवतील तर त्यांनीं समाजाची चांगलीच सेवा केल्याप्रमाणें होईल. प्रत्येक शहरांत विद्यार्थिवसतिगृहें सर्वांच्या सोयीचीं असणें शक्य नाहीं. आपल्या देशांत तर जातिनिर्बंध जबर असल्यानें ज्या त्या जातीच्या लोकांनीं विद्येच्या कार्यास असें सहाय्य केल्यास फार चांगलें होईल.

पालकांनीं * घरीं मुलांवर अभ्यासाचा निराळा बोजा लादूं नये, घरीं शिक्षक नेमूं नये, फक्त मुलें कांहीं अनीतिमार्गानें जात नाहींत एवढें पहावें, इतकीच त्यांस प्रार्थना आहे. थोडें बहुत पाठ करण्यास किंवा लिहिण्यास दिलें असेल तेवढेंच त्यांचें घरचें काम. बाकी सर्व वेळ विश्रांतींत व मौजेनें खेळण्याबागडण्यांत घालविणें हेंच लहान मुलांस हवें असतें व तेंच त्यांनीं करावें अशीं

* टीप पृष्ट १७ पहा.

आमची इच्छा आहे. पुढें जसजशीं तीं मोठीं होतील तसतशीं आपल्यावरील जबाबदारी ओळखून वाढत जाणारें घरांत करण्यासाठीं नेमून दिलेलें अगर दिशा दाखवून ठेवलेलें काम करण्यास पात्र होतात. लहानपणीं शरीर धडधाकट करून पुढें पडणाऱ्या ओझ्यासाठीं काटकपणा शारीरिक मेहनतीनें आणण्याच्या पूर्वीं त्यांच्या बुद्धीकडून अधिक काम करून घेण्याचा मोह आवरणें हें शिक्षकाचें मुख्य कर्तव्य आहे. कांहीं मुलें मोठीं तरतरीतपणा दाखवितात. जें सांगावें तें पटापट ग्रहण करून उत्तम तयारी दाखवितात. ह्मणून या यंत्रांतून बराच माल निघण्याजोगा आहे असें वाटूं लागून त्यास अधिक शिकवूं लागल्यास त्यांच्या बुद्धीस हळूहळू क्षीणता प्राप्त होते आणि प्रथम आपल्या वयाच्या मानानें जो प्रथम फार हुषार दिसत होता तोच मुलगा पुढें बुद्धिहीन वाटूं लागतो. यामुळें सामान्य शिक्षकांची व आईबापांची मुलाला लवकर शिकवून पटाइत करण्याची उत्कंठा असते तीस आळा घालणें हें आह्मीं आपलें कर्तव्य समजतों.

समर्थविद्यालयाचा चवथा विशेष हेतु असा आहे कीं आपल्या धर्माची, चालीरीतींची व संप्रदायांची चांगली माहिती प्रत्येक हिंदूला असली पाहिजे. हल्लीं आमच्या मासतिथींनीं कालगणना अगदीं बाजूस राहिली आहे. त्यामुळें इंग्रजी महिने व तारखांपलीकडे मोठमोठ्या विद्यार्थ्यांस कांहीं माहित नसतें. कोणास अतिशयोक्ति वाटेल; परंतु मॅट्रिक, पी. ई. व आय. ई. पर्यंत शिकलेल्या कित्येक विद्यार्थ्यांस महालक्ष्मीचा रथ कधीं निघतो, हनुमज्जयन्ती, गणेशचतुर्थी, अक्षय्यतृतीया, नागपंचमी, महाशिवरात्र, नवरात्र, दक्षिणायन व उत्तरायण, कोजागरी या कोणत्या महिन्यांत येतात हें ठाऊक नसतें. ब्राह्मणाच्या मुलांस पुरीं २४ नांवें देखील धड

ह्मणतां येत नाहींत. ही स्थिति बदलावी या हेतूनें त्यांस कृतीनें व उपदेशानें या गोष्टींची ओळख पटवून देण्याचे इलाज चालू आहेत गोष्ट अगदीं सुलभ व साधी आहे; पण आपलेपणा विसरल्यानें पंचांग ह्मणजे थोतांड वाटूं लागलें आहे. तेव्हां ही माहिती थोडी-बहुत आमच्या विद्यार्थ्यांस असावी असा हेतु पुढें ठेवला आहे. फाजील देवभोळेपणा वाढविल्याशिवाय शरीरसामर्थ्यवृद्धीला व स्वधर्मजागृतीला उपयोगीं पडणाऱ्या अशा ज्या गोष्टी आहेत त्यांच्याकडे दुर्लक्ष्य होऊं नये असे आमचें मत झालें आहे.

विद्यार्थ्यांमध्यें परस्पर प्रेमभाव वाढून त्यांनीं आपले खेळ व व्यायाम एकत्र व गुरूच्या देखरेखीखालीं करावे या हेतूनें शाळेच्या अभ्यासक्रमांतच हा एक विषय निविष्ट करण्यांत आला पाहिजे ह्मणून तसें समर्थविद्यालयांत अमलांत आणलें आहे. गांवाबाहेर कोठेंतरी ठरीव जागीं खेळण्यास जाणें व तें शिक्षकासमवेत जाणें, हें शेवटल्या तासाचें शाळेचें कामच धरलें आहे. इतर तासांत गैरहजरी चालत नाहीं तशीच याहि तासांत चालत नाहीं. अशानें प्रत्येक मुलगा व्यायाम रोज घेतो अशी आमची खातरी होते. सुटीच्या दिवशीं सर्वांस नदीस स्नानाला नेणें व तेथें पोहावयास शिकविणें, पाण्यामध्यें घटकातास डुंबणें, खेळणें वगैरे सर्व सुरक्षित-पणास बाध न येतां करण्याचें ठरवून सवडीप्रमाणें अमलांत येतें. हल्लीं महापूर असल्यानें हें काम मर्यादित आहे. पण कार्तिक-मासाच्या पुढें या कार्यभागाचे सुपरिणाम दिसून येतील. तरीपण महाएकादशीस व कर्कसंक्रमणास सर्व विद्यार्थी व्यवस्थितपणें स्नानास नेले होतेच. आषाढी एकादशीस मुलें गंगेवरून स्नानानंतर सुमारें दोन मैल विठोबाच्या दर्शनास रांगेनें शहरांतून चाललीं असतां

मोठी मौज दिसत होती. सुटीच्या दिवशीं आठवड्या पंधरवड्यानें सर्व मुलें गांवाबाहेर दूर देवस्थानास न्यावयाचीं व तेथें प्रत्येकानें आपआपल्या घरचें फराळास आणलेलें खावयाचें. वाटेनें जातांना खडे फेंकीत, उड्या मारीत खेळ खेळत, करमणूक करावयाची. या सर्व प्रकारांचे वेळीं शिक्षक व मुलें एकमेकांशीं केवळ मित्राप्रमाणें वागतील अशी योजना ठेवण्याचा क्रम समर्थविद्यालयाच्या चालकांचा आहे. हे दोन प्रकार सांगितले अशासारखेच प्रकार लागोपाठ चार दोन सुट्या असल्या तर कोठें तरी एखादा सबंध दिवस खर्चावा, वर्षांतून एक दोन वेळां दूरदूरचीं क्षेत्रें पहाण्यास जावें व बराच भाग पायीं प्रवास करावा, असा संकल्प आहे. अनुकूलतेप्रमाणें सर्व गोष्टी होतील अशी उमेद आहे. *

समर्थविद्यालय हें एका मोठ्या राष्ट्रीय चळवळीचें अंग आहे. तेव्हां **परदेशी** गोष्टींचा या विद्यालयास होतां होईल तों विटाळ करूं द्यावयाचा नाहीं. परंतु अगतिक ह्मणून जो होईल त्याबद्दल एकंदरीनें राष्ट्रहित साधून वचपा काढतां आला पाहिजे हें धोरण राखावयाचें असा पूर्ण निश्चय आहे. परकीयांचें चांगलें असलें तरी आह्मांस नको, तें चांगलें या मोहानें त्यास जवळ केलें तर त्याच्या बरोबरीचें वाईट सहजावृत्या अज्ञानानें किंवा मोहानें आपल्यांत शिरेल अशा भावनेनें आमचे पूर्वज यवनांचा स्पर्श टाळीत होते. '**न वदेद्यावनीं भाषां प्राणैःकण्ठगतैरपि**' यांतला गूढ भाव हाच आहे. गाईचें

---

* निबंध लिहिला त्यावेळेस व स्थलास उद्देशून आलेल्या गोष्टीस संस्थेच्या सामान्य स्वरूपाचा विचार करितांना महत्त्व देण्याचें कारण नाहीं. ऋतुमानाप्रमाणें सारासार विचार करून सर्व व्यवस्था केली जाते हा मुख्य मुद्दा आहे तो सहज ध्यानांत येईल.

दूध पवित्र खरें परंतु **श्वदृतौ गोपय इव** हा मीमांसकांचा दृष्टांत तरी हेंच सुचवितो. कुत्र्याच्या कातड्याच्या पिशवींत घातल्यामुळें अत्यंत पवित्र पदार्थासुद्धां अनादेयत्व प्राप्त होतें. धर्मौदार्य, परमतसहिष्णुता, ज्ञान कोणापासूनही घ्यावें, इत्यादि उदात्त विचारांनीं भोळीं राष्ट्रें फसतात. ह्मणून परदेशीय जें जें ह्मणून असेल त्याचा त्याचा स्पर्श होऊं नये असा विचार खरा. तरीपण हल्लींच्या कालीं जें जें आमचें होतें तें तें, विशेषतः चांगलें होतें तें तें, परक्यांनीं नेलें आहे ह्मणून आपलें परत आणण्यासाठीं ह्मणून परदेशीं गमन करणें व परदेशीयांपासून घेणें प्राप्त झालें आहे. आपलें जें चांगलें तें दुसऱ्याकडे गेलें ह्मणून पुनश्च आपलेंसें करून घेण्यासाठीं जेवढा सकृद्दर्शनीं परदेशी माल घेणें प्राप्त आहे तेवढा घेणें ह्मणजे खरोखरी स्वदेशी चळवळीस सहाय्यच करणें आहे अशी मनाची समजूत करून घेऊन जेवढें परदेशी चांगलें तेवढें घेतलें पाहिजे. फार दिवस आमच्यांतील चांगल्या गोष्टी परक्यांनीं लुटून नेल्या, त्याचा वचपा काढण्यासाठीं आमच्याकडील ज्ञान नेऊन त्यांनीं जी आपण वाढ केली आहे तीही आह्मांस सर्व इकडे आणिली पाहिजे. तात्पर्य आज परकीयांमध्यें जेवढें ह्मणून चांगलें दिसत आहे तेवढें आपण काबीज केलें पाहिजे. तसें झालें तरच ते नाना प्रकारानीं व नाना मिषांनीं आमचेकडील पैसा नेत आहेत तो नेण्यास आह्मीं प्रतिबंध करूं शकूं. या दृष्टीनें समर्थविद्यालयास परदेशी गोष्टींचा त्या **परदेशी** एवढ्यासाठींच त्याग करण्याची सोय नाहीं. आमच्या मोठमोठ्या ऋषींचा व पंडितांचा निष्काम विद्याव्यसंग जर्मन लोकांनीं उपटला आहे तो तेथून आणल्याशिवाय आमचा उत्कर्ष होणार नाहीं. आमच्याकडे बारीक तलम सूत व रेशीम यांचें कापड निघत होतें,

ती कला परकीयांनीं नेली ती परत आणावयास नको काय ? त्यासाठीं खरे देशभक्त भरतपुत्र जर्मनी, फ्रान्स, अमेरिका व इंग्लंड इकडे पाठविले पाहिजेत. तेथील तज्ज्ञ लोक इकडे आणून त्यांस किंवा त्यांच्या हातांखालीं तयार झालेल्यांस समर्थविद्यालयासारख्या विद्यालयांत शिक्षक नेमले पाहिजेत. आपण जेव्हां दुसऱ्याच्या सहवासानें बिघडूं अशी भीति होती त्यावेळीं दुसऱ्याचा स्पर्श, दुसऱ्याची भाषा आह्मांस नको होती; परंतु दैवदुर्विलासानें आज कांहीं गोष्टींमध्यें परकीयांच्या तोंडाकडे पहावयास लागतें इतकेंच नाहीं तर परकीयांचें पाय धरणेंही भाग पडतें. पोटाची खळगी भरण्यासाठीं किंवा आपल्या पोरांबाळांस नोकरी लावण्यासाठीं नव्हे तर राष्ट्राच्या भावी कल्याणासाठीं वाटेल ती हीनता परदेशीं पतकरावी लागते, ही गोष्ट **शिवाजी महाराजांस गोसावी व्हावें लागलें** व पीटर दि ग्रेटला मजूरदार सुतार बनावें लागलें अशा उदाहरणांवरून लक्ष्यांत येण्याजोगी आहे. निःसीम राष्ट्रप्रेम मनांत आल्यावर आपण परदेशी लोकांचा व परदेशी वस्तूंचा कां व कसा उपयोग करितों हें रात्रंदिवस लक्ष्यांत वागवून मन आंतल्या आंत जळफळत असतें. **कार्यावरीच सज्जनीं दृष्टि** दिली पाहिजे हें चांगलें मनांत बिंबवून अगतिक व निरुपाय अशा वेळीं परदेशीचा अंगिकार करण्यानें स्वदेशीपणास कमीपणा येत नाहीं. हें बाळकडू समर्थविद्यालयांत उदाहरणानें व उपदेशानें प्रथमपासून पाजलें जाईल. येथील विद्यार्थी निकरानें वागतील; परंतु जगाच्या इतर भागांत जीं जीं उत्कर्षाचीं व सुखाचीं, सोयीचीं व समाधानाचीं साधनें प्राप्त होण्याजोगीं असतील तीं आपणास व आपल्या देशास मिळविण्यासाठीं लागेल तें शिक्षण प्राप्त करून घेण्याकरितां वाटेल तें साहस करण्यास व पडतील ते कष्ट सोसण्यास व लागेल तो

उद्योग करण्यास सिद्ध होतील तरच या शाळेच्या प्रस्थापकांस आपल्या निरपेक्ष श्रमाचें व स्वार्थविमुखतेचें चीज झालें असें वाटेल. अविवाहित राहून सर्व विद्याक्रम संपवावयाचा इतकेंच नव्हे तर आपल्या देशासाठीं देह झिजवावयाचा ह्मणजे देशप्रीतीशिवाय दुसऱ्या मनोविकारास अंतःकरणांत थारा द्यावयाचा नाहीं. कारण कोणत्याही एका कार्यास आपण वाहून घेतलें याचा अर्थच असा कीं तेथें दुसरें कांहीं सुचावयाचें नाहीं. अशा दृढ निग्रहाचे लोक निपजावेत व कांहीं निपजतील; परंतु विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर व गृहस्थाश्रमी बनल्यावरही शिक्षणकालांतील संस्कार त्यांच्या मनावर आमरण राहतील अशी आशा आहे.

समर्थविद्यालयांत अगदीं प्रथमपासून व्यवहारोपयोगी सृष्टिशास्त्रीय ज्ञान देण्याचा उपक्रम केला आहे. प्राथमिक शिक्षण संपल्याबरोबर निरनिराळ्या सृष्टिशास्त्राची थोडी थोडी केवळ मनोरंजनाप्रमाणेंच माहिती देत गेल्यानें विद्यार्थ्यांची चौकसबुद्धि वाढून या शास्त्रांच्या सहाय्यानें परदेशीयांनीं आपलें केवढें कल्याण करून घेतलें आहे व किती उद्योगधंदे काढले आहेत याची कल्पना येत राहील. ह्मणजे भलत्याच दुरभिमानाच्या भरीं भरून वेदांती न बनतां, पृथ्वीवर कोठें काय आहे तें जाणण्याची व तें आपल्या देशांत आणण्याची हांव उत्पन्न होईल असे कांहीं तरी विद्यार्थी निपजतील अशी उमेद आहे. स्वदेशी माल तयार करून कोणत्याही परदेशांतील सुखांचा व मौजेचा उपभोग घेण्यास राष्ट्र तयार झालें ह्मणजे अर्वाचीन सुधारणेचा कळस झाला. हें नवीन मिळवून आपली प्राचीन नीतिमत्ता, आस्तिक्यबुद्धि व मानसिक शास्त्रांतील गति या सर्वांची सांगड घालणें हीच हल्लींच्या जगांत पहिलें पद प्राप्त करून

घेण्याची गुरुकिल्ली आहे. साऱ्या दुनियेंत हें कार्य करण्यासाठीं परमेश्वरानें आपल्या अपार औदार्यानें एक देश योजिला असेल तर तो आमचा देश होय, असें येथील हवा, पाणी, नद्या, डोंगर, सुपीक जमीन व समुद्रकिनारा इत्यादि बाह्यसृष्टीचें ऐश्वर्य व अन्तःसृष्टीकडे वळलें असतांही सर्व जगास थक्क करून सोडणारें बुद्धिसामर्थ्य यावरून आमची बालंबाल खात्री झाली नसती, व हा सुदिन येण्यास बहुत युगें लागावयाचीं नाहींत ही अतर्कित प्रेरणा झाली नसती तर, या दुर्घट प्रयत्नास आह्मीं हातच घातला नसता. सद्धर्माच्या आश्रयानें नैतिक सुधारणा व ज्ञानबुद्धि या दोन गोष्टी साधल्या ह्मणजे सर्व ऋद्धिसिद्धि हात जोडून पुढें उभ्या राहतात. यासाठींच भगवद्गीतेंत चवथ्या अध्यायाच्या शेवटीं ज्ञानाची इतकी थोरवी वर्णिली आहे. ज्ञानप्राप्ति व ज्ञानदान यासारखें पुण्यकर्म नाहीं. सर्व राष्ट्रीय चळवळीचें रहस्य सर्व प्रकारचें ज्ञान लोकांस करून देण्यांत आहे. ज्ञानापासून कृति उत्पन्न होते. ज्ञान हेंच सामर्थ्य अशा अर्थाची इंग्रजी ह्मण आहे तिचा अर्थ हाच. अर्थात् ज्ञानानें प्राप्त होणारें सामर्थ्य अंगीं यावें याहून समर्थविद्यालयाचा दुसरा हेतु काय असूं शकणार ?

अशा प्रकारचें ज्ञान व त्यापासून उत्पन्न होणारें सामर्थ्य हल्लीं चालू असलेल्या विद्यालयांपासूनही मिळण्यास कोणतीच हरकत नाहीं. आह्मी जसे या समर्थविद्यालयांत शिक्षक आहों असेच शिक्षक त्या शाळांतही आहेत. कांहीं कमी बुद्धीचे नाहींत, कमी उत्साहाचे नाहींत; परंतु त्यांना लावून दिलेली जी शिस्त आहे ती शिस्त आह्मीं ह्मणतों तशा ज्ञानाच्या व सामर्थ्याच्या उलट आहे. हल्लीं इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, अमेरिका व जपान या राष्ट्रांत तसें ज्ञान व तसें सामर्थ्य उत्पन्न होत आहे.

खुद्द इंग्लैंडमध्यें सृष्टिशास्त्राचा अभ्यास करण्यास गेलेल्या येथील विद्यार्थ्यांचा अनुभव असा आहे कीं येथें दोन वर्षें ज्या गोष्टी नीट शिकण्यास पुरत नाहींत त्या तिकडे पंधरा दिवसांत सुरेख शिकविल्या जातात. यावरून आमच्या इंग्रजसरकारनें आमच्या तरुणांच्या आयुष्याची केवढी हानि केली आहे हें स्पष्ट दिसून येतें. कांहीं कांहीं विषयांच्या शिक्षणासाठीं तर आह्मांस तिकडे होतकरू लोक पाठवून तयार करून आणले पाहिजेत हें स्पष्ट आहे. आजवर ज्ञान न मिळतां निवळ ज्ञानाभासानें तृप्त होऊन राहिलों. आमच्या-प्रमाणेंच १०।१२ वर्षें विद्याभ्यास करून तिकडे विद्यार्थी नवीन नवीन शोध लावतात, व हरएक प्रकारें आपल्या ज्ञानानें व्यवहारदृष्ट्या राष्ट्राचा उत्कर्ष साधितात. आह्मांस मात्र हें शक्य नाहीं. आह्मीं दुर्दैवी किंवा बुद्धिहीन असा समज करून घेऊन हताश बसलों होतों, परंतु आतां इकडचे लोक तिकडे जाऊन तिकडच्या मी मी ह्मणणाऱ्या पंडितांच्या मंडळाकडून शाबास शाबास ह्मणवून घेऊं लागले आहेत तेव्हां पाणी कोठें मुरतें याची सुरेख ओळख पटली आहे. सरकारच्या स्कॉलर्शिपा घेऊन गेलेल्या दोन तरुणांनीं तिक-डची मान्यतम पदवी पटकावली. आतां आमच्या डोक्यांत उजेड पडल्यावरही जरूर तेवढें तिकडचें इकडे आणण्यास आह्मीं आळस करूं काय ? कधीं नाहीं करणार. इकडून तिकडे तरुण होतकरू लोक पाठवूं व तिकडून नाना देशींचे खरे गुणी शिक्षक इकडे आणूं आणि आमच्या राष्ट्रांतल्या राष्ट्रांत सर्व कांहीं गोष्टीं करून दाखवूं, अशी उमेद हल्लीं आह्मांस आली आहे. समर्थविद्यालयासारखीं विद्यालयें अशा प्रकारचे शिक्षक मिळाले तर २० वर्षांत जो चम-त्कार करून दाखवितील तो इतर राष्ट्रांतील विद्यालयांच्या १००

वर्षांच्या उद्योगानें होणार नाहीं. महाराष्ट्रांतील समंजस देशाभिमान्यांच्या मनांत परमेश्वर प्रेरणा करून आमच्या हेतूंस प्रोत्साहन देण्याची बुद्धि देईल तर ही गोष्ट सिद्ध होईल. हल्लींच्या परावलंबी शिस्तीनें झालेली हानि भरून काढावयाची आहे. तेव्हां आपल्या देशांतील प्राचीन शिक्षणपद्धति व अर्वाचीन सुधारलेल्या राष्ट्रांतील शिक्षणपद्धति यांचा सुंदर मिलाफ झाला पाहिजे. या गोष्टीला हात घालणें जितकें आवश्यक आहे तितकेंच जबाबदारीचें व कठीण आहे. हें काम एका दोघांचें नाहीं. मानवी स्वभावास आपले तें विशेष आवडतें अशामुळें, बहुत दिवस त्याचा आपल्या हातून उपमर्द झाला आहे अशामुळें व बऱ्याच गोष्टींत त्याचा त्याग केल्यामुळें आपली हानि झाली आहे असें स्पष्ट निदर्शनास आलें आहे, अशामुळें आह्मीं कदाचित् वाजवीपेक्षां पुराणप्रिय होऊन पाश्चात्त्यांच्या हितकर प्रकारांचा अनादर करूं. उलटपक्षीं हल्लींच्या पाश्चात्त्य वैभवास भुलून त्यांच्यांतील त्या वैभवाशीं असंबद्ध अशा पद्धतींचा अंगीकारही आह्मीं करूं. अशामुळें मोठ्या धीरतेनें, केवळ जगाच्या पालटलेल्या स्थितींत अवश्य त्याज्य अशा जुन्या गोष्टी सोडून तसेंच हल्लींच्या जगांत ज्यांचा स्वीकार केला नाहीं तर आपल्यांत कमीपणा येईल किंवा योग्य उत्कर्षास साहाय्य होणार नाहीं अशा पाश्चात्त्य देशांतील अर्वाचीन गोष्टींचा संग्रह करून आपण आज आपला मार्ग ठरविला पाहिजे. हें धोरण ठेऊन समर्थविद्यालयांत सर्व गोष्टी यथामति चालू केल्या आहेत. स्थूल दिशा निश्चित करून गौण भाग आहेत ते अनुभव घेत घेत कायम करण्याचा इरादा आहे.

येथवर समर्थविद्यालयाच्या स्थापनेला प्रवृत्त करणारें स्थूलमानाचें धोरण कसें आहे हें आमच्या प्रिय वाचकांच्या ध्यानीं यावें ह्मणून

लिहिलें आहे. आतां यापुढें हल्लीं चालू असलेला क्रम, आमच्या मनांत असलेल्या इच्छा व त्या परिपूर्ण होण्यास आवश्यक गोष्टी याविषयीं चार शब्द लिहावे असा मानस आहे.

शाळेची कल्पना जाहीर केल्यापासून बहुतेकानीं अभिनंदन करून प्रोत्साहनच दिलें आहे याबद्दल त्या सर्वांचे आभार मानणें जरूर आहे. पुष्कळांनीं अशा प्रकारचें विद्यालय पुण्यास काढावें असें सुचविलें.× तें शहर सर्व महाराष्ट्राचें केंद्र आहे हें एक कारण व दुसरें कारण व्यक्ति-विषयक आहे. अनेक मित्रमंडळीस वाटतें कीं हें नवीन प्रकारचें विद्यालय व तें कांहीं पदवीधर काढीत आहेत एवढ्यासाठींच या प्रयत्नास विघ्न येईल. इंग्रजसरकार साक्षात् आपल्या राज्यांत ज्या गोष्टी करीत नाहीं त्या संस्थानांत करवूं शकतें, ह्मणून अशा विघ्नाची भीति विशेष आहे असें तें ह्मणतात. परंतु आमचे हेतु उघड आहेत, आह्मीं सरकारची मदत मागत नाहीं तरी आमच्या शाळेंत काय चालतें हें पाहण्याची मोकळीक आहे. समर्थविद्यालय ह्मणजे हायस्कूलवजा-शाळा. ती प्रस्तुत राष्ट्रीयाशिक्षणाच्या चळवळींत एकट्या कोल्हा-पुरास निघून पुरे नाहीं. सुमारें दहा हजार वस्तीच्या गांवाला एक अशी पाहिजे आहे. पुण्यास असली एक तरी शाळा लवकर निघेल. प्रायः हल्लीं असलेल्या एखाद्या हायस्कुलास हें स्वरूप देण्यांत येईल. कोल्हापूरचें विद्यालय पहिल्यांदा ह्मणजे चार दोन महिने अगोदर निघालें आहे इतकेंच. यांत येथील मंडळीचीच सर्व कल्पना आहे असेंही नाहीं. सर्वांच्या मनांत आजकाल घोळत अस-लेल्या विचाराचें प्रस्तुत विद्यालय हें अपरिपक्व फळ आहे. कांहीं

---

+ हल्लीं समर्थविद्यालय हें तळगांव दाभाडे येथें रेल्वे स्टेशनच्या नैर्ऋत्येस एक मैलाच्या आंत मोकळ्या मैदानांत आहे.

अंशीं वऱ्हाडकर मंडळींनीं या कामीं बरीच अघाडी मारली आहे असें ह्मटलें तरी चालेल. तेव्हां एवढ्याशा उद्योगासाठीं नवी चिनी नवा दांडू करून नव्या जागीं डाव मांडण्यांत अर्थ नाहीं. ह्मणून सहाय्यकारी मंडळीची जुळवाजुळव झाल्याबरोबर येथेंच कार्यास आरंभ केला आहे. यालाच सर्व महाराष्ट्रीयांचें सर्वोपरी सहाय्य असल्यास येथेंच साऱ्या गोष्टी जमून येतील व याप्रमाणें इतर ठिकाणीं विद्यालयें निघण्याचा मार्ग सुकर होईल.

विद्यालयांतील शिक्षणक्रमाचें धोरण वर जें सामान्य विवेचन केलें आहे त्यास अनुसरूनच आहे. सरकारी किंवा त्याच नमुन्यावर चालू असलेल्या शाळांचा हेतु सरकाराचीं निरनिराळीं खातीं आहेत त्या खात्यासाठींच नोकर तयार करावेत असा आहे. शाळामास्तर, कारकून, मामलेदार, एंजिनीअर, वकील, न्यायाधीश व डाक्टर हे सर्व सरकारी नोकरीच्या लायकीचे लोक निष्पन्न व्हावे ह्मणून सरकारी शाळा व कॉलेजें आवश्यक होतीं व तीं तशीं काढलीं; परंतु नोकर लोकांची पहिली चणचण संपल्याबरोबर सरकार या संस्थांतून बाहेर पडलेल्या लोकांचा अनादर करूं लागलें. ज्या परीक्षा पास झाल्याबरोबर १००।१५० रुपयांच्या नोकऱ्या सहज मिळत त्या परिक्षांच्या लोकांस दहावीस अर्ज केल्यावर १५।२० रुपये मिळण्याची मारामार पडते. अलीकडे सुमारें १५।२० वर्षें तर सर्व मोठे मोठे गोरे व काळे अम्मलदार कोठेंही विद्यार्थ्यांस उद्देशून बोलूं लागले ह्मणजे ह्मणतात कीं सर्वांनीं सरकारी नोकरीच्या पाठी लागणें चांगलें नाहीं; स्वतंत्र धंदे करणें अवश्य आहे; व हातकाम करण्यांत कोणताही कमीपणा नाहीं. अम्मलदारांच्या मुखानें सरकार असा दुंदुभि वाजवून सुशिक्षित लोकांना नोकरीच्या दरवाजावर होणारा

मज्जाव जगजाहीर करतें; परंतु स्वतंत्र धंद्याच्या दिशा दाखवीत नाहीं. लॉर्ड रे साहेब गव्हर्नर होते तेव्हां धंदेशिक्षणाचें एक कॉलेज, व्हिक्टोरिआजुबिली टेक्निकल इन्स्टिट्युट निघालें. त्याविषयीं ज्यांना माहिती आहे त्यांचें ह्मणणें असें आहे कीं अगोदरच त्यांत खरें उच्च प्रतीचें धंदेशिक्षण देत नव्हतेच; परंतु कांहीं थोडें होतें तेंही हल्लीं बदललें आहे. हींच रड मुंबईच्या आर्ट्सस्कूलची आहे. उत्तम चित्रकार व शिल्पी तयार होण्यास थोडी बहुत मदत होईल असें रेखाकला व चित्रकला वगैरेचें शिक्षण मिळत होतें, तो अभ्यासक्रम बदलून टाकून आतां खेळवजा क्रम केला आहे. या दोन्हीं कॉलेजच्या अभ्यासक्रमाची पूर्वीची स्थिति ही युरोपांतील शाळांशीं ताडून पहातां अगदीं कनिष्ठ प्रकारची होती, परंतु हल्लींची तर अगदींच निकृष्ट झाली आहे, असें तज्ज्ञांचें ह्मणणें आहे. अशा स्थितींत समर्थविद्यालयासारख्या स्वतंत्रतेच्या बाण्यानें निघालेल्या शाळांनीं ज्या द्वारीं गेलें असतां अर्धचंद्र मिळतो अशा सरकारी नोकरीच्या दिशेकडे बिलकुल वळावयाचें नाहीं, व हल्लीं असलेल्या सरकारी नोकरीच्या किंवा अस्तित्वांत असलेल्या विश्वविद्यापीठाच्या परीक्षा तृणतुल्य मानावयाच्या, यांत नवल तें कसचें ? **निरीहाणामीशस्तृणमिव तिरस्कारविषयः** हें ह्मणणें बरोबर आहे. हाडाचीं काडें करून घेऊन अल्पस्वल्प वेतनावर नोकरी करीत जन्म काढण्यापेक्षां स्वतंत्र उद्योग करून बहुमानानें पोट भरण्याची सोय करणें व दिशा दाखविणें हें समर्थविद्यालयासारख्या संस्थेचें काम आहे. सरकारी नोकरींत चांगलीं सचोटीचीं माणसें पाहिजेत, आणि अब्रूनें करून घेतली तर सरकारी नोकरी ह्मणजे लोकसेवाच होय. कारण सरकार ह्मणजे लोकसेवक व लोकांच्या कल्याणा-

साठींच सत्ता धारण करणारी संस्था हें प्रत्येक विचारी माणसास कळतें; परंतु हातांत अधिकार आल्यावर आपण कोण व आपल्या अधिकाराची मर्यादा किती हें उद्दाम अधिकारी अगदीं विसरून जातो, त्याप्रमाणें अम्मलदारांचा समुदाय जें सरकार तेंही विसरतें. त्यांत सरकार व प्रजा यांचा संबंध जिंकणारे व जिंकलेले किंवा इतरदृष्ट्या विजातीय आल्यावर पुसूंच नये. योग्य काळीं व प्रसंगीं सरकारी नोकरी करण्याची पात्रता आहे असें शिक्षण समर्थविद्यालय किंवा अशीं विद्यालयें ज्या राष्ट्रीय विश्वविद्यापीठास जोडलीं जातील त्यांत तयार झालेल्या लोकांस मिळेलच. परंतु हल्लींच्या अवमानाच्या कालांत सुखानें मिळत नाहीं व अब्रूनें राखवत नाहीं अशा सेवेंत 'प्रतिहतसर्वेंद्रियशक्ति' होऊन राष्ट्रहानि करण्यास प्रवृत्त व्हावयाचें नाहीं अशा दिशेनें मार्ग क्रमणें हेंच उचित आहे.

हल्लीं सरकारी व खासगी शाळांत जाणाऱ्या तरुणांच्या मनांत तुह्मीं लिहितां असेंच येतें, पण त्यांच्यापुढें कोणचाच मार्ग नाहीं ह्मणून ते धोपट मार्ग सोडीत नाहींत; तुह्मीं जर अशा लोकांची जबाबदारी घेत असाल तर ते तुमच्याकडे येतील असें कित्येकांचें ह्मणणें आहे. त्यांस उत्तर इतकेंच कीं, अपारशक्तीचें सरकार ही हमी घेत नाहीं; उलट आमच्या दारीं येऊन उपयोग होणार नाहीं, तुमची सर्वांची आमच्या हातून सोय होणार नाहीं असें स्पष्ट सांगून लाथाडीत आहे तेथें मात्र तुह्मीं हौसेनें किंवा निरुपाय ह्मणून कां होईना डोंबी देतां; पण आमचेकडे मात्र हमी मागतां हा अन्याय नव्हे काय? दुसरी गोष्ट अशी कीं कोणच्याही शहरांत जाऊन सरकारी नोकरीवर पोट भरणारे किती व इतर रीतीनें वाणी, उदमी, तेली, तांबोळी, शिंपी, कुणबी, सुतार कुंभार, लव्हार

इत्यादि लोक किती याचा विचार करा व सरकारी शाळा सोडीपर्यंत खर्च केलेली बुद्धि व द्रव्य यांचा विचार करा. तुमच्याहून कमी बुद्धीची व शिक्षणाचीं माणसें सुखानें पोट भरतात किंवा श्रीमंतही आहेत. कित्येक तर तुह्मी सरकारांत मिळवूं शकाल इतका पगार देऊन तुह्मांस घरीं नोकर ठेवण्याच्या योग्यतेचे आहेत. उगीच शांतपणानें शहरांत फिरून या लोकांचें वेतन, वर्तन वगैरे पहा व एखाद्या कारकुनाचेंही पहा; दोघांच्या शरीरसामर्थ्याची तुलना करा. जगांत नोकरीशिवाय उद्योग किती आहेत तें नीट पाहिलें व निश्चयानें कोणताही एक आपला धंदा ठरविला ह्मणजे, ज्या बुद्धीनें परीक्षा पास होऊन गुलामगिरी मिळावयाची त्या बुद्धीच्या निम्यानें सुखाची उपजीविका प्राप्त होईल. सामान्यतः शारीरसामर्थ्य प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांस सुतारकाम, घडकाम, विणकाम, शिवणकाम हे व इतर साधतील ते धंदे इच्छेप्रमाणें एक किंवा अनेक करतां यावे अशी योजना समर्थविद्यालयांत करावयाची आहे. विणकामाची तयारी अंमळ लवकर होईल असें आहे. व्यापारी हिशेबठिशेब ठेवण्याचें पाश्चात्त्य व इकडील शिक्षण मिळण्याची सोय करणें तितकें कठीण नाहीं. जसजसा मुलगा मोठा असेल व शरीरसामर्थ्य चांगलें असेल तसतसा त्यास पालकाच्या संमतीनें व खर्चानें तसेंच कित्येक वेळां शिष्यवृत्ति देऊन हिंदुस्थान देशांत निरनिराळ्या ठिकाणीं कारखाने व शिक्षणालयें आहेत त्या ठिकाणीं उमेदवार किंवा शिष्य ह्मणून ठेऊन तयार करवून आणण्याची उमेद आहे. कामांत तयार करून देण्याची सोय दाखविणें हें आह्मीं करूं. बाकी पुढची धमक ज्याची त्याची आहे. पहिल्यापासून आमच्या हातीं तयार होणाऱ्या विद्यार्थ्यांत ही धमक उत्पन्न करण्याची धमकही पण आमच्यांत आहे.

हल्लीं विद्याभ्यासांत खर्च होतो इतका पैसा खर्च न होतां, इतकी शरीरशक्ति क्षीण न होतां उद्योगधंद्यांत लागणारें धाडस अंगीं येऊन विद्यार्थी बऱ्या मार्गास लागतील अशी आमची उमेद आहे.

विद्वान् व पंडित होण्याची ज्यांची इच्छा आहे त्यांस तर मार्ग चांगलाच खुला आहे. त्यांस वाटेल तितकें शिक्षण मिळण्याची सोय करण्यांत येईल. यांस शिक्षक, उपदेशक, व्याख्याते, वर्तमानपत्रांचे संपादक, असे धंदे खुले आहेत. याविषयीं फारसें लिहिण्याचें कारणच नाहीं. आजवर शिकून तयार झालेल्या लोकांस या धंद्याची माहिती आहेच. सर्व राष्ट्रभर कानाकोपऱ्यांत अलीकडील जगांत काय चाललेलें आहे, आपलें राष्ट्र इतर राष्ट्रांच्या किती मागें आहे, त्यांतील लोकांची नैतिक, औद्योगिक व राजकीय कर्तव्यें काय आहेत, या सर्व गोष्टींचें योग्य शिक्षण देण्यास फिरते व स्थायिक उपदेशक आपल्या जुन्या चालीरीतीस अनुसरून ह्मणजे हरिदास, पुराणिक वगैरे तयार होणें जरूर आहे. अशा प्रकारचे लोक जगांत जेथें जेथें हिंदू लोक जातील तेथें पाहिजे आहेत. मारिशसमध्यें, आफ्रिकेमध्यें, अमेरिकेंत कोठेंही हिंदू गेले कीं, त्यांच्या मागोमाग त्यांची धर्मनीति जागृत ठेवण्यासाठीं आपले पुजारी, शिक्षक, पुराणीक व वैद्य गेले पाहिजेत. तशा व्यवस्थित रीतीनें आपल्या लोकांच्या वसाहती होत नाहींत व त्यांना तेथें त्रास होतो. त्याचें कारण असें कीं अशिक्षित लोक पोटाला मिळेल तिकडे जावयाचे एवढ्यासाठीं करारमदार करून बांधून घेईल त्याच्याबरोबर जातात. राष्ट्रांत जागृति होऊं लागेल तेव्हां आपले लोक असे मेंढराप्रमाणें जाणार नाहींत. या व अनेक कामास लोकनायक पाहिजे आहेत. हल्लीं आमचा शहाण्यासुरत्या लोकांचा वर्ग एखाद्या मोठ्या खोलींत

कोंडून ठेवल्यासारखा झाला आहे. बाहेर काय आहे हें माहीत नसल्यामुळें व बाहेर बहुत लोक आहेत व त्यांचें उत्तम चाललें आहे हेंहि ध्यानांत न घेतल्यामुळें, नवीन शिक्षणानंतर काय? अशी त्यांची घाबरगुंडी झाली आहे. जोमाचें शिक्षण मिळालेला राष्ट्रांतील तरुणवर्ग ह्मणजे राष्ट्राचा नायक; पुढें मागें त्याच्या इच्छे-प्रमाणें सर्व कांहीं चालेल. ही उदात्त कल्पना त्यांच्यापुढें उभी राहिली नाहीं. श्रीसमर्थ रामदासांच्या ग्रंथांच्या वाचनानें जर त्यांच्या अंगांत सामर्थ्य व आपल्या उत्कर्षाची दिशा आली नाहीं, तर आह्मीं पामर काय बोधूं शकणार? आह्मीं तरी काय ह्मणणार? डोळे उघडून पहा हेंच ह्मणणार कीं नाहीं. रॅलीब्रदर्स, सासून कंपनी, ग्रॅहम कंपनी, मार्कस आणि कंपनी आणि खुद्द सरकार ही एक परदेशी कंपनी ह्यांचे चालक काय आकाशांतून पडलेले दिव्य पुरुष आहेत? आणि तुह्मी काय वारुळांतून वर येणाऱ्या मुंग्या आहां? माणसासारख्या माणसानों! आपली केवढी जमात, केवढी संघशक्ति आहे, याचा विचार करा. सामर्थ्य कशाचें? **सामर्थ्य आहे चळवळीचें.** काम नासतें कशानें? **आळसें तों काम नासतें.** सामर्थ्य कोणाचें? **जो जो करील त्याचें.** माझें कसें होईल? असें ह्मणून आगाऊ विचारील त्याचें काय होईल? बुद्धिनाश व प्राणनाश.

समर्थविद्यालयाचें सामान्य धोरण सांगतेवेळीं ब्रह्मचारित्वाचा कडक नियम पाळण्याचा निश्चय कळविला आहे. दुसरा वयाच्या अटीचाही नियम पाळला जातो; परंतु सशक्तपणाच्या कसोटीचा नियम हल्लींच्या अवनत स्थितिमुळें तितका कडक रीतीनें पाळतां येत नाहीं. * मुलांचें संगोपन नीट झालें नसल्यानें व मूळचीच प्रकृति

* हल्लीं या नियमाकडे विशेष लक्ष दिलें जातें.

व बांधा समाधानकारक नसल्यानें चांगला धडधाकट, अमक्या ठरीव रुंदीच्या छातीचा, ठरीव ऊंचीचा व ठरीव वजनाचा मुलगा असला तरच त्याचा प्रवेश करावा व बाकीच्यास परत लावून द्यावें असा परिपाठ ठेवला नाहीं. योग्य व्यायामानें व चांगल्या देखरखीनें अशीं मुलें सुधारतात व पुढें सशक्त होतात व उंची व वजन यावरच सर्व प्रकारचा काटकपणा अवलंबून नसतो असेंही वैद्यकमत पडल्यामुळें व आमच्या नवीन शिक्षणाच्या मामल्यांत सर्व प्रकारच्या लोकांस धंदे मिळतील असें असल्यानें शाळेची शिस्त पाळण्याचें कबूल करतील त्यांस तूर्त ह्मणून घेतलें आहे. पळणें, खेळणें, उड्या मारणें, नदीचीं स्नानें करणें वगैरे व्यायामाच्या कसोटीस कांहीं नियमित काळांत उतरलीं नाहींत तर त्यांस काढून टाकावयाचें असा मानस आहे. खरी इच्छा वर दर्शविल्याप्रमाणें उंची, वजन, पाहून विद्यार्थी घ्यावेत अशी आहे. परंतु इतक्या कडकपणांस कांहीं काळ गेला पाहिजे. फ्रेडरिक दि ग्रेटच्या बापाची धिप्पाड शिपायांबद्दल कशी हौस होती तें इतिहासज्ञास माहीत आहे. आमच्यांतील प्रमुख लोकनायकांनीं शरीरप्रकृतीबद्दल व शरीरसामर्थ्याबद्दल काळजी दाखविली तर राष्ट्रांतील अडाणी लोक तसेंच करतील. एकंदर राष्ट्रांतच हल्लीं शरीरसामर्थ्याविषयीं अनास्था पुष्कळ आहे. संस्थानिकांजवळ कांहीं थोडे बहुत पैलवान असतील ते असतील. परंतु कालेंकरून लार्ड रॉबर्टसचा ग्रेटब्रिटनमध्यें चाललेला उपदेश ग्रेटर ब्रिटनलाही ते करतील असा रंग दिसत आहे. ज्या त्या देशांत सैन्यें वाढवावीं, आरमारांत भर घालावी असा क्रम चालविला आहे. आह्मीं हिंदी लोक ज्या कला इंग्रजांनीं आह्मांस कधीं शिकविल्या नाहींत, त्या शिकण्यास त्यांच्याकडून परवानगी घेऊन तयार झालें

पाहिजे. या देशांत शिंकू न देतील तर दुसऱ्या देशांत जाऊन शिकण्याची तयारी केली पाहिजे. आज इंग्रजलोक आमच्या सरहद्दीची काळजी चांगली घेत आहेत परंतु त्या पायीं किती तरी पैसा पाण्यासारखा ओतला जात आहे. गेल्या मार्चमध्यें नामदार गोखले यांनीं येथील लोकांचें सहाय्य नागरिक सैन्य बनवून घ्यावें असें सुचविलें, त्यावर टाईम्ससारख्या पत्रांनीं नाक खाजवून आमची थट्टा केली आहे, आणि 'आहे कां तयारी?' ह्मणून विचारिलें आहे. या प्रश्नास उत्तर देण्यास गोऱ्या सोजीराच्याइतकी साम्राज्याच्या संरक्षणाची आमची तयारी आहे असें सांगणारा तरूणवर्ग सुशिक्षितांतूनच उभारला पाहिजे. कारण शिक्षित व अशिक्षित हा भेद मुळीं राष्ट्रांतून लुप्त होण्यांसाठीं लोकांस प्राथमिक व दुय्यम शिक्षण देण्यास हल्लींच्या सर्व पुढाऱ्यांनीं कंकण बांधलें पाहिजे ही तर आमची पहिली मागणी आहे. लेखन, वाचन व गणित हें प्राथमिक शिक्षण व स्वधर्मज्ञान, स्वदेशाच्या इतिहासाचें ज्ञान, युरोपच्या प्रमुख इतिहासाचें ज्ञान, व्यापारी व सृष्टिज्ञानविषयक भूगोलाची चांगली माहिती, जगांतील प्रमुख भाषांपैकीं चार दोन भाषांचें ज्ञान, संस्कृत भाषेचें सामान्य ज्ञान व कोणताही उदरनिर्वाहाचा धंदा हें दुय्यम शिक्षण. यापैकीं बराच भाग राष्ट्रांतील प्रत्येक माणसास आला पाहिजे तर हिंदुस्थान देश हल्लींच्या काळांत आपलें ईशनिश्चित प्रथम स्थान पावेल. एरवीं देवानें दिलें आणि कर्मानें नेलें असें होईल. ब्रिटिश साम्राज्याच्या टापूंतून हिंदुस्थानास हें वैभव व मान्यता प्राप्त झाल्यानें आजच्या इंग्रज मुत्सद्यांचीं वचनें सत्य होऊन, तमाम दुनियेंत इंग्रजी राज्याचा बोलबाला झाल्याशिवाय राहणार नाहीं. समर्थविद्यालय तें काय एवढेंसें त्यांत इतके दूरवर

मनाचे मांडे खाण्याचा प्रकार काय चालला आहे हा आक्षेप वाचकांच्या जिव्हाग्रावर उड्या मारीत आहे, हें आह्मीं जाणून आहों; परंतु या गोष्टी अशा लखलखीत पुढें दिसल्याशिवाय आमचें पाऊल पुढें पडलें नाहीं. तेंच चढत्या सूर्याचें बिंब आमच्या वाचकांनीं आमच्या इतकें स्पष्ट नाहींतरी अंधक अंधक तरी पहावें ह्मणून हें वाग्जाल त्यांचेपुढें आह्मीं पसरलें आहे. दीर्घ वाचन, अचाट भाषाप्रभुत्व, अपार विचारशक्ति यापेक्षां सामान्य धोरण, बहुश्रुतपणा, शरीरसामर्थ्य व धडाडीची वागणूक या गोष्टी मुख्यत्वेंकरून साधावयाच्या असल्यानें वरचेवर परीक्षा, वरचेवर शिष्यवृत्तिसमर्पण आणि त्याबरोबर आपसांतील आकस वाढविणें यापासून आह्मीं परावृत्त झालों आहों.

एका परगांवच्या गृहस्थानें रस्त्यांतल्या रस्त्यांत उभें राहून विचारलें, ‘ कांहो, अमके अमके गृहस्थ ते तुह्मीच कां ? ’ जरा उगी राहल्यानें, समजावयाचें तें समजून त्यानें प्रश्न केला. ‘ काय हो तुह्मी ही नवी शाळा कशाला काढली, यांत तुमचा हेतु काय ? ’ घरीं भेटा ह्मणावयाची सोय नाहीं. तेव्हां त्याला इतकेंच सांगितलें कीं “ बहिरा आणि मुकी आई ” ची गोष्ट तिसऱ्या पुस्तकांत आहे( आतांच्या मराठी ३ ऱ्या पुस्तकांत आहे कीं नाहीं माहित नाहीं. ) तीच गोष्ट येथें लागू आहे. आपल्यास परमेश्वरानें जें कमी केलें आहे तें आपल्या मुलास देवानें दिलें आहे हें पाहून तिला आनंद झाला. आमच्या स्थितींत आमच्या शिक्षणांत जीं जीं व्यंगें राहिलीं तीं तीं उलट यत्न केला नाहीं तर, तशींच पुढील पिढींत येणार असें वाटून खेद झाला, ह्मणून “ यत्नास लागावें या हेतूनें हा उद्योग आरंभिला आहे ” “ ह्मणजे काय नीट समजलें

नाहीं, " असें त्या गृहस्थानीं ह्मटल्यावरून विचारिलें ' खरेंच कां तुह्मांला सर्व समजून घ्यावयाचें? तुमचा आमचा परिचय नाहीं तेव्हां तुह्मांस घरीं कसें बोलवावें? ' इतकें ह्मटल्याबरोबर ते गृहस्थच ह्मणाले ' हो अलबत येईन, घटकाभर सावचितपणें बोलूं '. पुढें हे गृहस्थ पुनः मुळींच दिसले नाहींत ही अवस्था. किंवा कांहीं आकस्मिक काम उद्भवलें असेल. कोणी नाहीं ह्मणावें? पुढील भाग त्यांच्या नजरेस पडला तर त्यांचें थोडें समाधान होईल. मागील भागही अवश्य वाचला पाहिजे. पण पुढील भागांत सर्व गोष्टी थोडक्यांत येणार आहेत ह्मणून तेवढाच पहाण्याची शिफारस केली आहे.

१. शिकवितांना व शिकतानां सर्व गोष्टी परक्या भाषेच्या द्वारा शिकाव्या लागल्यानें त्या विद्यार्थ्यांस नीट समजत नसत. स्वभाषेंतून शिक्षणाची सोय असती तर किती तरी ज्ञान अधिक झालें असतें व किती अल्प श्रमानें झालें असतें असें वाटत असे. त्या अनुभवाचा उपयोग करून सर्व विषय देशी भाषेंतून शिकवावयाचे हा निर्धार झाला आहे.

२. सर्व हिंदुस्थान देशांत एक भाषा कोणती व्हावी व सुशिक्षितांचा व्यवहार चालण्यास एक भाषा पाहिजे यांत शंका नाहीं. निरनिराळ्या देशीभाषा बोलणाऱ्या लोकांच्या मनांत चालूपैकीं कोणत्याही भाषेस हा मान देण्याचें नाहीं असें दिसतें. साहजिक रीत्या हिंदी भाषा ही जागा पटकावील अशी अटकळ करणें कठीण नाहीं. तरी पण संस्कृत भाषेस हें स्थळ मिळाल्यास ह्मणजे हें तिचें पूर्वींचेंच पद प्राप्त झाल्यास, कोणाचाच असंतोष होणार नाहीं ह्मणून सर्वांस संस्कृतभाषा यावी ह्या हेतूनें तिचें सुलभपणें अध्ययन होणें

जरूर आहे. तें हल्लींच्या शाळांतून झालें नाहीं व होणार नाहीं ह्मणून सुमारें १९ संधिनियम, १०।१२ समास नियम, १०।१२ धातुसाधिताचे नियम, शब्दरूपावलि व धातुरूपावलि एवढ्यां पूर्व तयारीनें एकदम संस्कृत वाङ्मयांत विद्यार्थ्यांचा प्रवेश करून द्यावयाचा हा एक आमचा बेत ठरला आहे. प्रत्येक हिंदूस संस्कृत आलेंच पाहिजे. पाहिजे त्या प्रबुद्ध माणसास महिन्याचे आंत स्वभाषा लिहितांवाचतां शिकविण्याची आह्मांस उमेद आहे. तसेंच पाहिजे त्या प्रबुद्ध माणसास चालचलाऊ बोलणेंलिहिणें परमुलखांत जरूर पडतें इतकें ६ महिन्यांच्या आंत संस्कृत शिकवितां येईल असा आमचा भरंवसा आहे. मग थोडेंथोडें पहिल्यापासून ९ वर्षांच्या क्रमांत शिकविलें असतां बरेंच येईल व त्याचा राष्ट्रांतील निरनिराळ्या प्रांतांत व्यवहार चालण्यास मोठा उपयोग होईल. या बाबतींत हिंदीसारख्या भाषेचा उपयोग होईल. परंतु ती शिकविण्यासाठीं संस्कृताप्रमाणें चोहोंकडे शिक्षक मिळणार नाहींत. लिपीचीही अडचण आहेच. संस्कृतलिपि सर्वांस येते व भाषा कोठेंही शिकतां येते. वर सांगितलेल्या पूर्वतयारीनें पंचतंत्र, हितोपदेश, सोप्या कथा, व कादंबरीसार इतकेंच वाचतां येईल. थोडी शिक्षकाची मदत लागेल. हीं पुस्तकें दहावेळां वाचून लिहिण्याबोलण्याचा परिपाठ ठेवल्यास कोठेंही अडचण पडणार नाहीं. अधिक परिश्रम करील त्यास 'अधिकस्याधिकं फलम्' हें सांगावयास कोणा मोठ्या भविष्यवाद्याची जरूर नाहींच.

३. पाश्चात्त्य नीतिकल्पना व पौरस्त्य नीतिकल्पना यांची मूलतत्त्वें कधींही भिन्न असूं शकणार नाहींत. यांचें कारण मानवस्वभाव सर्वत्र सारखाच असावयाचा. फक्त परिस्थितिभेदामुळें आचारभेद व संप्रदायभेद होतात. यामुळेंच धर्म व पंथही निरनिराळे होतात.

निवळ तर्कशास्त्राच्या कसास लावले तर यांचें समाधानकारक रीतीनें समर्थन होणार नाहीं, परंतु भाषा, धर्म, समजुती व आचारविचार यांच्या ऐक्यामुळें लोकांचे राष्ट्रसबंध जुळून त्या त्या मानवसमूहास विशिष्टत्व आलेलें असतें. तें व त्याचा अभिमान ह्यालाच राष्ट्रभिमान किंवा देशभक्ति असें नांव आहे. ही सदैव कायम राखून आपल्यांत सुधारणा होत जावी अशा हेतूनें समर्थविद्यालयांत इतिहास व भाषाविषय यांचें अध्यापन चालू आहे व पुढेंही राहील. आपल्या देशाचा आपल्या लोकांनींच लिहिलेला इतिहास विद्यार्थ्यांस शिकविल्यानें त्या देशाची व त्याच्या इतिहासाची माहिती होऊन अभिमान जागृत होतो. तसे हिंदुस्थानचे इतिहास फार झाले नाहींत, तरी पण त्यांतल्यांत्यांत धनुर्धारी यांनीं लिहिलेलीं चरित्रें व रा. चिपळूणकर व रा.. सरदेसाई यांनीं लिहिलेले इतिहास व रा, गोगटे, पावगी, वगैरेनीं लिहिलेलीं पुस्तकें, तसेंच नानाफडणवीस, महादजी शिंदे, परशुरामभाऊ, बापूगोखले वगैरे वीर व मुत्सद्दी यांचीं चरित्रें व काव्येतिहाससंग्रहांतून व इतरत्र अलीकडे छापलेले ऐतिहासिक लेख यांचा उपयोग करून घेतला जाईल. रामायण, महाभारत, व त्यांतील निराळ्या गोष्टीं व इतिहास यांचीं पुस्तकें तयार करुन रा. रा. बळवंतराव द्रविड यांनीं फार उत्तम कामागिरी केली आहे. ही आमच्या विद्यालयासाठीं जणूं काय त्यांनीं पूर्वतयारी केली असें आह्मांस वाटतें व आमच्या विनंतीचा आदर करून त्यांनीं हीं पुस्तकें आह्मांस आमच्या शाळेकरितांच चांगल्या सवलतीनें देण्याचें मान्य केल्याबद्दल आह्मीं त्यांचे आभारी आहों. भारत व रामायण हे राष्ट्रांतील अस्सल ग्रंथ होत. यांच्या मराठी भाषेंत कितीतरी रूपांनीं कितीतरी कवींनीं आवृत्ती काढल्या आहेत

परंतु अलीकडे ९० वर्षांत विश्वविद्यापीठांच्या सरकारी शाळा व पाठशाळारूपी खाणींतून विद्वन्मणी निघाले, त्यांच्या वाचनांत यांपैकीं एकही आवृत्ति आली नाहीं. एवढ्यावरूनच प्रचलित शिक्षणपद्धति दुष्ट अशा छापास लायक ठरत आहे. ग्रंथराज दासबोधासारख्या प्रासादिक ग्रंथास व तो ज्या भाषेंत लिहिला आहे त्या भाषेस विश्वविद्यापीठांत जागा नसावी याहून दुसरी हीनतेची व अराष्ट्रीयत्वाची बाब दुसरी असेल हें आमच्या कल्पनेंतही येत नाहीं. परंतु अर्ध्या शतकानंतर तरी हा मोह नाहींसा होत आहे, या अंधकारांतून आपण थोडथोडे प्रकाशांत येत आहों ही तरी परमेश्वराची या राष्ट्रावर कृपाच आहे. एकदां उजाडलें ह्मणजे झपाझप सूर्यकिरणें पसरूं लागतात; तेव्हां तसें झाल्यास समर्थविद्यालयांतील शिक्षणाचें धोरण सर्वांस पटून जिकडेतिकडे समर्थविद्यालयें होतील. सारांश, अशा राष्ट्रीय ग्रंथांचें दर इयत्तेंत वाचन होण्याची प्रथमपासूनच खबरदारी घेऊन, पांच वर्षांत महाभारत व रामायण हे ग्रन्थ संपविले जातील; आणि मराठी वाङ्मयाची गोडी इतकी लागेल कीं, त्याच्या वाचनाशिवाय पुढें चैन पडेनासें होईल व त्या वाङ्मयास उत्तेजन देण्याची प्रवृत्ति वाढेल. संस्कृत ग्रंथवाचनासंबंधानेंही हेंच धोरण राहील. कारण हेंच व्यंग आमच्या आजपर्यंतच्या शिक्षणांत राहिलें होतें. रत्नावलीसारख्या नाटिका नेमून रामायण व महाभारतास मज्जाव करणाऱ्या शिक्षणक्रमास काय नांव द्यावें ? बीभत्स श्लोकांचे अलंकारग्रंथ खपतात पण मनुस्मृतिसारखा सुरेख ग्रन्थ नेमला जात नांहीं, त्या विश्वविद्यापीठांत एकदम सुधारणा झाली पाहिजे होती. मराठी व संस्कृत वाचनामध्यें हें राष्ट्रीय स्वरूप राखण्याची खबरदारी घेतली तरी परदेशी वीर, वक्ते, मुत्सद्दी,

तत्त्ववेत्ते, कारखानेवाले व ग्रंथकार यांचीं चरित्रें वाचून अलीकडल्या जगांतील शहाणपण व साहसाचा परिचय व्हावा या हेतूनें ग्लॅडस्टन, सिसरो, कॉब्डेन, ब्रॅडला, डिमॉस्थिनीस, बर्क, क्राम्प्टन, वॉट, ओकोनेल, फ्रँक्लिन, वॉशिंग्टन, जॉनसन, गोल्डस्मिथ वगैरेंचीं चरित्रें व परदेशचे नाना इतिहास वाचनक्रमांत नेमले जातील.

४. वरील कलमाचाच भाग असून जिचें पृथक्त्वानें दिग्दर्शन करावेंसें वाटतें ती गोष्ट ही कीं, अभ्यासाचें ओझें कमी करावें या सबबीनें १८७९ सालापासून दुय्यम शिक्षणांतून अजीबात कमी केलेले ग्रीस व रोमचे इतिहास आमच्या विद्यालयांतील विद्यार्थ्यांस अवश्य पढविण्यांत येतील. सर्व यूरोपांत त्या साग्र इतिहासाचें ज्ञान प्रत्येक शिक्षितास असतें, परंतु आमच्या पदवीधरास मात्र तें असलें तरी चालेल नसलें तरी चालेल अशी सरकारची प्रवृत्ति आहे. ऐतिहासिक व राजनैतिक शिक्षण मिळण्यास अत्यवश्य अशा भागाची सरकारानें केलेली अवहेलना चांगली दृष्टोत्पत्तीस आल्यावर तिकडे दुर्लक्ष करणें अशक्य आहे.

५. हल्लींच्या शिक्षणांत व राष्ट्रांतील सर्व व्यवहारांत इंग्रजी भाषेस ती राजभाषा आहे ह्मणून फाजील महत्त्व आलें आहे. त्या पदावरून तिला भ्रष्ट करून इतर विषयांप्रमाणें तो एक अवश्यक विषय करणें जरूर वाटल्यानें तिचें कांहीं ज्ञान समर्थविद्यालयांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांस होईल. जगांतील अहवाल कळण्यास, इंग्लंड, अमेरिका, आस्ट्रेलिया, कानडा इतक्या मोठ्या प्रदेशांवर फिरण्यास व पत्रव्यवहार करण्यास उपयुक्त असल्यानें आणि हा देश ब्रिटिश साम्राज्याचा अवयव असल्यानें शिक्षित ह्मणविणारास या भाषेचें ज्ञान अवश्य आहे. परंतु त्या मर्यादेबाहेर देशभाषा व गीर्वाणभाषा तसेंच जगांतील

प्रमुख राष्ट्रांच्या भाषांपैकीं एक दोन भाषा शिकण्यास फुरसत मिळूं नये व बुद्धिसामर्थ्य उरूं नये इतका इंग्रजीचा हव्यास करण्याचें बिलकुल कारण नाहीं. त्या भाषेचें हल्लीं जितकें मार्मिक ज्ञान करून घेण्याकडे राष्ट्रांतील उत्साह व सामर्थ्य खर्चीं पडत आहे त्यांचा दुसऱ्या अत्यंत महत्त्वाच्या कामीं उपयोग होण्याजोगा आहे ह्मणून बोलण्या लिहिण्यापुरती व आपल्या भाषेच्या द्वारा मिळण्याजोगें नाहीं असें आपआपल्या कामापुरतें ज्ञान त्या भाषेंतूनच मिळण्यापुरती ती भाषा आली ह्मणजे शेंकडा ९९ शिक्षितांस बस आहे. यासाठीं इंग्रजी शिकविण्याची पद्धति व त्या भाषेंतील वाचावयाच्या पुस्तकांची निवडणूक यांत पुष्कळ फरक करावयाचें आह्मीं योजिलें आहे. नाना तऱ्हेच्या पुस्तकावलींतील उपयुक्त भाग घेऊन व इकडच्या रिवाजाचे भाग घालून आपली पुस्तकावली * निराळी तयार करावयाची आहे. परंतु हें काम अधिक मंडळीचें साहाय्य व कांहीं दिवसांचा अनुभव मिळाल्यावर हातीं घ्यावयाचें आहे. प्रथमतः तर संभाषणपद्धतीनें ह्मणजे भाषा शिकण्याच्या स्वाभाविक पद्धतीनें इंग्रजी शिकविण्यास प्रारंभ केला आहे व हा प्रयोग यशस्वी होईल अशी उमेद आहे. बोलणें ऐकून ऐकून लहान मुलें आपल्या घरीं नेहमीं भाषा शिकतात. अंतर इतकेंच कीं, त्या मुलांस बोलणारांचा सहवास पुष्कळ असतो. यामुळें संभाषणपद्धतीनें प्रारंभ करून शब्दांचे उच्चार बसूं लागले व बोलण्याचाही थोडा सराव झाला ह्मणजे पुस्तकावरून शिकण्यास सुलभ जाईल.

६. निवळ बुद्धिशिक्षणाकडे सर्व लक्ष पुरविल्यामुळें आमच्या राष्ट्रांतील तरुणवर्ग अगदीं परावलंबी झाला आहे. सरकारी नोकरी

---

* हें काम बऱ्याच खर्चाचें आहे. बराचसा द्रव्यनिधि लवकर जमेल तर हें काम लवरक हातांत घेतां येईल.

मिळेल तर त्याची सोय होते, पोटभर अन्न मिळण्याची तरतूद होते, व अन्नामें जीवयात्रा चालते. एरवीं सर्व दिशा शून्य झाल्यासारखें त्यास भासतें. ही स्थिति कांहीं अंशीं पालटून त्यांचें लक्ष औद्योगिक व्यवसायाकडेही लावावें असा सर्व राष्ट्रनायकांचा अभिप्राय झाला आहे. ह्मणून रेखाकला, वीणकाम, सुतारकाम, घडकाम, शिवणकाम इत्यादि गोष्टींच्या शिक्षणाच्या सोयी करणें हें समर्थविद्यालयाचें प्रधान अंग आहे. त्यासाठीं निवळ कामकरूपेक्षां वरिष्ठ दर्जाचे लोक तयार व्हावेत ह्मणून शास्त्रीयरीत्या निरनिराळ्या शाखांचें औपपत्तिक व प्रायोगिक ज्ञान देण्याची योजना करावयाची आहे. रेखाकला व सृष्टिशास्त्रांपैकीं रसायन, वनस्पति व शारीर यांची थोडक्यांत मनोरंजक रीतीनें माहिती देण्यास प्रारंभ झाला आहेच. याच शाखेसाठीं द्रव्यसाहाय्य मोठें लागेल. या सर्व गोष्टींबद्दल महाराष्ट्रांत अभिमान उत्पन्न झाला ह्मणजे कशाचीच उणीव पडणार नाहीं.

७. व्यायाम व करमणूक या संबंधानें वर सामान्य विवेचनांत बराच भाग येऊन गेला आहे. त्यासंबंधानें पुनः लिहिण्याचें कारण नाहीं. अभ्यासाचें ओझें कमी केल्यानें व याच विषयाकडे विशेष लक्ष पुरविल्यानें राष्ट्रांतील तरुणांत स्पष्ट दिसून येणाऱ्या सामर्थ्यहानीस प्रतिबंध करणें व त्यांच्या अंगांत सर्व प्रकारें कोणत्याही राष्ट्रांतील तरुणांची योग्यता आणणें हा तर आमच्या विद्यालयाचा आदिहेतु आहे.

या विद्यालयांत प्रवेश होण्यासाठीं गणित, वाचन व लेखन हे विषय झाले असले ह्मणजे झालें. हे विषय येथील पूर्वींच निघालेल्या **समर्थ-**

बालशालेंत * आह्मास पाहिजे त्या धोरणावर शिकविले जातात. मुलांस सुरेख घडघड वाचतां येऊन मतलब साधारण सांगतां यावा असा भाषाविषय, झडती, सामान्य तोंडचे हिशेब, व्यवहारी अपूर्णांक, त्रैराशिक व चांगलें मोडी व बालबोध अक्षर, वाणीशुद्धि, महिम्न, लक्ष्मीस्तोत्र व प्राथमिक आवश्यक ब्रह्मकर्म इतक्या गोष्टी शिकविल्या जातात. नकाशा दाखविण्यापलीकडे भूगोल शिकविला जात नाहीं व इतिहास वाचनपुस्तकाप्रमाणें वरचेवर थोडाथोडा वाचून घेतला जातो. इतकें प्राथमिक शिक्षण समर्थविद्यालयांत येणाऱ्यांस पुरें असतें. समर्थबालशालेंतून येणाऱ्या मुलांखेरीज मुलांची चांचणी घेऊन तो कच्चा असल्यास कांहीं दिवस त्या शाळेंत पाठविला जातो.

आमच्या शाळेंतून विद्यार्थी हल्लीं अस्तित्वांत असलेल्या विश्वविद्यापीठाचे पदवीधर बनविण्यासाठीं तयार केले जात नाहींत हें वर आलेंच आहे. तर मग आमचे शिक्षक तरी हल्लींचे पदवीधरच पाहिजेत असा आह्मी निर्बंध ठेवीतच नाहीं. मात्र त्या त्या विषयांत तरबेज होण्याची त्यांची इच्छा असावी. त्यांना शिक्षकाचा धंदा मनापासून आवडत असून ते त्या कामास आमरण वाहून घेणारे असावेत या हेतूनें शिक्षकाश्रम ‡ पृथक् ठेविला आहे. ह्मणजे सर्व शिक्षक

* ही कोल्हापुरास होती. अशा धोरणावर शाळा कोठेंही निघण्यास हरकत नाहीं. पूर्ण सात वर्षांच्या मुलांसच शाळेंत घ्यावें, सहा सहा महिन्यांच्या सहा इयत्ता असाव्यात, वाचनपुस्तकें तिसऱ्या इयत्तेपासून लावावींत, तीं तीन किंवा फार तर चार असावींत. अशा शाळांस वळण लावण्यासाठीं आमच्याकडून पुस्तकावली तयार व्हावी असा हेतु आहे.

‡ विद्यालयाजवळच जमीन घेऊन तेथें शिक्षकांचीही रहाण्याची सोय करण्यांत येणार आहे. ज्यांतून आमच्या विद्यालयांतच शिक्षक तयार होतील असा प्रबुद्ध विद्यार्थिवर्ग आहे. यांतील सर्व विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांप्रमाणें वसतिगृहांतच रहातात. हे स्वतः अध्ययन करून अध्यापनाचेंही काम करतात.

एका ठिकाणीं एकाच शिक्षकालयांत राहण्याची सर्व व्यवस्था केली आहे. शिक्षणाचें धोरण एक रहावें ह्मणून सहवासानें व संभाषणानें मतें व आचरण दृढ होण्यासाठीं शिक्षकाश्रमाची योजना आहे. यापैकींच निदान एक असामी विद्यार्थिवसतिगृहांत राहील. शिक्षकांचा सर्व चालचलाऊ खर्च चालविला जाईल. त्यांना कोणत्याही प्रकारें कुंटुंबचिंतापाश असूं नये हें चांगलें अशा निग्रहानें विद्याव्यवसायी, राष्ट्रोदयेच्छु तरुण हल्लींच्या शिक्षणाप्रमाणें एम्. ए. पासून खालीं मॅट्रिकपर्यंत जे कोणी या अटीवर व येथील शिक्षणाप्रमाणें वागण्याचें मान्य करून समर्थविद्यालयाच्या कार्यास साहाय्य करूं इच्छीत असतील, त्यांनीं प्रथम संस्थेचे चिटणीस रा. रा. राजाराम दामोदर देसाई बी. ए. यांच्याशीं पत्रव्यवहार करून शिक्षकाश्रमांत प्रवेश करावा. सारांश, अगदीं बालपणापासून समर्थबालशाला, समर्थविद्यालय व शिक्षकाश्रम या तीन संस्थांतून तयार झालेलीं माणसें आमच्या कार्यास कालेंकरून तयार होतील अशी उमेद आहे. मध्यंतरीं **भारतीय विश्वविद्यालय** व त्याच्या शाखा झाल्यास तिकडे समर्थविद्यालयांतील लोक प्रवेशपरीक्षेसाठीं जातील. पुढें त्यांचें उच्च शिक्षण होऊन इतर राष्ट्रांप्रमाणें वीर्यवती विद्या * आमच्या तरुणांस प्राप्त होईल. त्यायोगें शिक्षकाश्रमाचें काम हलकें होईल. तोंपर्यंत सर्व तयारी आपली आपणासच केली पाहिजे. प्रस्तुत प्रसंगीं जगन्नाथ पंडिताची कोकिलान्योक्ति ध्यानीं घेऊन भावी भारतीय विश्वविद्यालयाची प्रतीक्षा करीत स्वस्थ बसणें योग्य.

---

* हें निरुक्तकार यास्क या प्राचीन ग्रंथकारांनी विद्येला दिलेलें विशेषण आहे. सर्व प्रकारें वीर्यवान् विद्यार्थिवर्ग बनविणारी विद्या तीच खरी विद्या. Knowledge is power अशी इंग्रजींत एक म्हण आहे. शांतिपाठांत गुरुशिष्य 'सहवीर्यं करवावहै' ह्मणत असतात हें प्रसिद्धच आहे.

तावत्कोकिल विरसान्यापय दिवसान्वनांतरे निवसन्
यावन्मिलदलिमालः कोऽपि रसालः समुल्लसति ।

येणेंप्रमाणें कार्यास प्रारंभ केला आहे. नुसत्या जाहिरातीपेक्षां माहिती अधिक द्या असें अनेक ठिकाणांहून लिहून आल्यावर या उद्योगाचे हेतू व त्याची दिशा दाखविली आहे. या सर्व प्रयत्नांस ईशकृपा सहाय झाल्यास राष्ट्राचें दैन्य फिटणार आहे.

हें पुस्तक वाचून राष्ट्रीय शिक्षणाचें काम किती पवित्र व महत्त्वाचें आहे हें लक्षांत येईल. हें काम सर्व महाराष्ट्राचें असून तें सर्वस्वी लोकाश्रयावरच अवलंबून आहे. तेव्हां ज्यांना अधिक साहाय्य करण्याचें सामर्थ्य नसेल त्यांनीं प्रत्येकीं निदान एक रुपया दिल्यास पुष्कळ मदत होईल. सर्व महाराष्ट्रीयांस या कामीं मदत करण्याची सद्बुद्धि होईल असा आमचा पक्का भरंवसा आहे.

## परिशिष्ट १ लें.

# समर्थविद्यालय (तळेगांवदाभाडे.)

नमनाचे दोन श्लोक ह्मणून कामास प्रारंभ होतो. इंग्रजीशिवाय सर्व विषय मराठींत शिकविले जातात. शास्त्रीय माहिती प्रथमपासून दिली जाते. रेखाकला, प्राणिशास्त्र, रसायनशास्त्र व वनस्पतिशास्त्र हीं सुरू आहेत. सर्व मुलांस सुलभ रीतीनें संस्कृत शिकविलें जातें. इंग्रजींत प्रवेश करून देण्यास **संभाषणपद्धती**चाच उपयोग करण्यांत येतो. ऐतिहासिक पुरुषांचीं चरित्रें व आपल्याच लोकांनीं लिहिलेल्या स्वदेशाच्या इतिहासाचा उपयोग केला जातो. अक्षरा (बालबोध व मोडी) बद्दल विशेष काळजी घेतली जाते. गणित व्यवहारोपयोगीच शिकविलें जाईल. रामायण, महाभारत यांतील सर्व माहिती क्रमाक्रमानें साद्यन्त होण्याची योजना आहे. प्रत्येक मुलास गायनाचें थोडें ज्ञान असावें असें धोरण आहे. होतकरू मुलांस अधिक शिकाविलें जाईल. ब्राह्मणास ब्राह्मकर्में शिकविण्याची सोय आहे. संस्कृत काव्याध्ययन सुरू होईपर्यंत विद्यार्थ्यांकडून सुलभ सुभाषितें पाठ करविण्यांत येतात. हिंदी व गुजराती या भाषाही शिकविण्यांत येतात. कलाकौशल्य व उदीमधंद्याची माहिती, व्यापारी हिशेब व हातकाम हें तर या शाळेचें मुख्य स्वरूप ठरविलें आहे. त्याप्रमाणें सुतारी व विणकाम सुरू झालें आहे.

सर्व मुलांचा मोकळ्या हवेंत खेळ खेळण्याचा व व्यायाम घेण्याचा नित्य पाठ आहे. आठवडयाचे सुट्टीचे दिवशीं ( गुरुवारीं ) मुलें दोन चार मैलांवर बाहेर फिरावयास जातात. तसेंच मधून मधून गंगास्नानाची संवय ठेविली आहे. मुलांना पोहण्यासही शिकविलें जातें. या सर्व प्रसंगीं शिक्षक लोक बरोबर असावयाचे. हीं सर्व कामें शाळेंतील विषयांहून कोणत्याही प्रकारें कमी महत्वाचीं समजावयाचीं नाहींत.

व्यवहारी अपूर्णांक, बहुराशिक, सरळव्याज इतकें गणित व मराठी ४ थ्या पुस्तकासारखें पुस्तक घडघड वाचतां येऊन मतलब सांगतां येणें इतका अभ्यास पूर्वी झालेला असला पाहिजे. सहा वर्षांत आठ इयत्ता केल्या आहेत. पहिल्या ४ सहा सहा महिन्यांच्या, पुढील ४ एक एक वर्षाच्या आहेत. पहिलीं दोन वर्षें दरमहा ८१२, पुढें अनुक्रमें १, १॥, २ व २॥ रु. फी आहे. पहिल्या महिन्यास दुप्पट फी पडेल.

**राजाराम दामोदर देसाई,** बी. ए., चिटणीस.

# समर्थविद्यालयाचे नियम.

( १ ) समर्थविद्यालयांत येणारा मुलगा शरीरप्रकृतीनें व दृष्टीनें योग्य असल्याचें वैद्यकी तपासणीअंतीं ठरल्यावरच त्याचें नांव पटांत दाखल होईल.

( २ ) दहा वर्षें पूर्ण झालेल्या व पंधरा वर्षांच्या आंतील अविवाहित मुलांचा समर्थविद्यालयांत प्रवेश होईल. त्याचप्रमाणें त्यांनीं विद्यालयांतील अभ्यासक्रम पुरा होईपर्यंत अविवाहित राहिलें पाहिजे.

( ३ ) नवीन येणारा मुलगा पहिल्या इयत्तेंत यावयाचा असल्यास वर्ग सुरू झाल्यापासून एक महिन्याच्या आंत आला पाहिजे. वर्षारंभ कार्तिक शु॥ १५ स होईल.

( ४ ) इतर वर्गांत येऊं इच्छिणारा विद्यार्थी ज्या वर्गास योग्य दिसेल त्यांत घातला जाईल.

( ५ ) विद्यार्थिगृहाच्या शिस्तीनें सर्व शिक्षण व्हावयाचें असल्यानें सर्व विद्यार्थी विद्यार्थिगृहांतच राहिले पाहिजेत.

( ६ ) सर्व विद्यार्थ्यांस सर्व नियम सारखेच लागू केले जातील. श्रीमंत व गरीब हा भेदभाव चालणार नाहीं.

( ७ ) विद्यालय सुरू असतांना व सुटीच्या दिवसांत कोठें कांहीं कार्यक्रम ठरविला असल्यास कोणत्याही विद्यार्थ्यांस रजा मिळणार नाहीं. अगदीं अपरिहार्य कारणांचा विचार अर्थात् केला जाईलच.

( ८ ) कोणचाही नियम मोडल्याबद्दल अगर इतर अपराधाबद्दल शासन करण्याचा अधिकार, व शिस्त लागण्यासाठीं विद्यार्थ्यांस वाटेल तो वर्तनक्रम व राहणी लावून देण्याची मुखत्यारी विद्यालयांतील शिक्षकांकडे राहील.

( ९ ) विद्यालयांत मुलगा ठेवतांना विद्यालयाचे सर्व नियम मी वाचून पाहिले आहेत व ते मला मान्य आहेत असें पालकांनी लिहून दिलें पाहिजे.

( १० ) कोणाही पालकास विद्यार्थिगृहांत असलेल्या मुलास भेटावयास येण्यापूर्वी अगर इतर कोणा सभ्य गृहस्थास शाळा पहाण्यास यावयाचें असल्यास, चिटणिसांस आगाऊ कळविलें पाहिजे.

# विद्यार्थिगृहाचे नियम.

१. विद्यार्थिगृहांत रहाण्याचा व भोजनाचा खर्च दरमहा ९ रु. येतो. * यांत पिण्याचें पावशेर दूध, दोन वेळचें भोजन, मधला फराळ, न्हावी, परीट, दिवाबत्ती इतक्या बाबींचा समावेश होतो. प्रवेशसमयीं ५ रु. अनामत ठेविले पाहिजेत. विद्यालय सोडतेवेळीं ही रक्कम परत मिळेल. विद्यालयांतील अभ्यासक्रम पुरा होण्यापूर्वी अपरिहार्य कारण नसतां विद्यालय सोडल्यास ही रकम परत मिळणार नाहीं. पाकपात्रमूल्यांशाबद्दल प्रत्येक विद्यार्थ्यास प्रारंभीं १ रुपया द्यावा लागेल.

२. प्रत्येक विद्यार्थ्यानें येतांना ताटवाटी, तांब्यापंचपात्री, सामान ठेवण्याची पेटी, समई व बिछाना हे जिन्नस बरोबर आणले पाहिजेत. चार सदरे, दोन कोट, एक टोपी किंवा रुमाल, नेसावयाचीं धोतरें, अंग पुसण्याचा पंचा किंवा टॉवेल, पादत्राण वगैरे जिन्नस प्रत्येकाजवळ असले पाहिजेत.

३. **दिनक्रमः**—सकाळीं ५ वाजतां उठून प्रातःस्मरण, शौच, मुखमार्जन, स्नान, संध्या, नमस्कार वगैरे प्रातर्विधि आटोपावयाचे. ७–१० अभ्यास, १०–११॥ भोजन व विश्रांति, ११॥–५ शाळा, ५–७ क्रीडा व व्यायाम, ७–८ भोजन ८–९॥ अभ्यास, भारतादिवाचन, रोजनिशी लिहिणें, व ईशस्मरण, ९॥–५ निद्रा. ऋतुमानाप्रमाणें वरील क्रमांत थोडाबहुत फेरफार होईल.

४. कोणाही विद्यार्थ्याच्या पालकाचें विद्यार्थिगृहांत अपरिहार्य कारणानें राहणें झाल्यास त्याचा खर्च त्या विद्यार्थ्यावर पडेल.

५. विद्यार्थ्याच्या खर्चाकरितां पाठवावयाची रक्कम पालकांनीं परभारें विद्यार्थ्याकडे न पाठवितां **व्यवस्थापकाचे** नांवें पाठवावी. दरमहाच्या खर्चाची रक्कम प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेच्या आंत आगाऊ पाठविली पाहिजे.

६. कोणताही खर्च करणें अगर बाहेर जाणें असल्यास व्यवस्थापकांची परवानगी घेतली पाहिजे.

७. दर महिन्याचे ३ तारखेच्या आंत व्यवस्थापकाकडून मागील महिन्याचा खर्च व मुलाचा अभ्यास व वर्तणूक यांसंबंधीं पत्र रवाना होईल.

८. औषधोपचारासंबंधीं खर्च ज्याचा त्यानें सोसावयाचा. योग्य व शक्य ती शुश्रूषा करण्यांत येईल.

**जनार्दन सखाराम करंदीकर,**
व्यवस्थापक, विद्यार्थिगृह.

---

* सध्यां महर्घता असल्यानें हा खर्च ९।८ आकारण्यांत येतो.

# समर्थविद्यालय.

## प्रबुद्धविद्यार्थिवर्ग.

समर्थविद्यालयांत एक प्रबुद्धविद्यार्थिवर्ग काढला आहे. त्यांत अविवाहित व १६ वर्षांहून अधिक वयाच्या विद्यार्थ्यांचा प्रवेश होईल. मॅट्रिक किंवा स्कूलफायनलपर्यंत शिकलेले किंवा त्या परीक्षा उतरलेले विद्यार्थी यांची प्रवेशपरीक्षा घेऊन त्यांस दाखल केलें जाईल.

अशा प्रकारें दाखल केल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांस निरनिराळ्या विषयांत उच्च प्रतीचें शिक्षण देण्यांत येऊन अध्यापनाचे व अशाच इतर लोकोपयोगी कामाकरितां तयार करण्यांत येईल. ही तयारी झाल्यावर त्यांची योजना सदर प्रकारचे कामीं करावयाची असल्यामुळें विद्यार्थिदशेंतील चालू खर्चाचा बोजा कोणत्याही प्रकारें विद्यार्थ्यांवर पडणार नाहीं. हल्लीं संस्थेच्या सांपत्तिक स्थितीकडे पाहून असे विद्यार्थी घेण्याचें बंद केलें आहे. या पुढें येऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वतःचा खर्च सोसावा लागेल. याप्रमाणें तूर्त नियमित विद्यार्थ्यांसच दाखल करण्याचें ठरविलें आहे तरी ज्यांची या वर्गात येण्याची इच्छा असेल त्यांनीं शिक्षणाच्या व चांगल्या वर्तणुकीच्या दाखल्यासह खालीं सही करणार यांजकडे अर्ज करावा.

तळेगांव–दाभाडे. } राजाराम दामोदर देसाई,
चिटणीस.

# कायम शिक्षकवर्ग ( समर्थविद्यालय. )

**विष्णु गोविंद विजापूरकर**, एम्. ए.
**राजाराम दामोदर देसाई**, बी. ए.
**जनार्दन सखाराम करंदीकर**, बी. ए., एलएल. बी.
**वामन मल्हार जोशी**, एम्. ए.
**दत्तात्रय विनायक पटवर्धन**, एच. एल. एम्. एस.

## परिशिष्ट २ रें

# महाराष्ट्रविद्याप्रसारकमंडळ.

सुमारें दोन वर्षांपूर्वी या मंडळाची स्थापना करण्यांत आली, तेव्हांपासून शाळेच्या अभिवृद्ध्यर्थ प्रयत्न सुरू आहेत. हल्लीं तळेगांवदाभाडे येथें स्टेशनजवळ स्वतंत्र मालकीची जागा घेतली आहे. या ६४ एकर जाग्यावर या संस्थेचें **समर्थविद्यालय** कोल्हापुराहून आणलें आहे.

आतां सत्तेची जागा झाल्यानें महाराष्ट्रविद्याप्रसारकमंडळाचें एक व्यापक विद्यापीठ स्थापन करण्याची वेळ आली आहे. वाङ्मयात्मक, व्यापारविषयक व औद्योगिक ( शेतकी धरून ) शाखांची सोय केली पाहिजे; व मराठी भाषा समजते अशा ह्मणजे मुंबई इलाख्यांतील सर्व मराठी जाणणारे जिल्हे, वऱ्हाड, नागपूर, निजामशाही, बडोदा, इंदूर, ग्वालेर वगैरे ठिकाणच्या अशा सर्व प्रांतांस आज आपण संयुक्त–महाराष्ट्र असें नांव देणें योग्य असून सदर सर्व भागांतील लोकांनीं या कार्यभागास हातभार लावला पाहिजे. या सर्व प्रदेशांचे उपयोगासाठीं एका मोठ्या विद्यास्थानाची जरूरी आहे. सर्व देशभर सुरू असलेल्या राष्ट्रीय शिक्षणासंबंधीं जागृतीस अनुरूप असें कांहीं या संयुक्त महाराष्ट्रांतील लोकांचे हातून व्हावयाचें असेल तर तें अशा मोठ्या विद्यास्थानावांचून सिद्धीस जाणें शक्य नाहीं. परदेशीं जाऊनें हरतऱ्हेनें शिक्षणाची प्राप्ति करून घेणाऱ्या होतकरू तरुणांची पूर्व तयारी करून देण्यास या देशांत राष्ट्रीय धोरणावर चाललेली व एतद्देशीयांच्याच हातीं असलेली संस्था नाहीं. यामुळें वाटेल त्यानें परदेशीं जाऊन वाटेल तें शिकून यावें असा प्रकार चालला आहे. हल्लीं विश्वविद्यापीठांच्या प्रवेशपरीक्षेनंतर कोणा विद्यार्थ्यास निवळ वाङ्मयात्मक, शास्त्रीय व औद्योगिक विषयांचें परिशीलन करण्याची इच्छा असल्यास तसें विद्यापीठ नसल्यानें आजवरच्या धोपट मार्गाचें अवलंबन करावें लागतें. ही अडचण वर दर्शविलेल्या प्रकारचें राष्ट्रीय विद्यापीठ काढल्यानें दूर होणार आहे. सर्व जगभर धाडशी व उत्साहशाली एतद्देशीय व्यापारी मंडळाचें जाळें पसरण्याचा व्यवस्थित प्रयत्न करणारे लोक आह्मी योजिलेल्या विश्वविद्यापीठाचीं **पारंगत** पदवी मिळवून तयार झाले तर, आपल्या देशांतील उद्योगधंद्यास योग्य वळण मिळेल. बुद्धिशिक्षणाचें महत्त्व तर कमी असणें अशक्य आहे. स्वदेशाच्या स्थितीविषयीं लोकसमूहांत पसरलेलें गाढ अज्ञान नाहींसें करण्यास सुशिक्षित लोकनायक पाहिजे आहेत. तसेंच हरएक

प्रकारच्या तात्विक विषयांवर विवेचन करण्यास समर्थ असा विद्वद्वर्ग निपजल्या-शिवाय प्राचीन कालापासून मिळालेलें या देशाचें अग्रस्थान रहाणें कठीण आहे. याप्रमाणें सर्वांगीं उच्च शिक्षण प्राप्त करून देणाऱ्या विद्यापीठाची उभारणी करण्यास प्रस्तुत समय फार अनुकूल आहे असें जाणून तशा कार्यास लोकसहाय्य मागण्याचें आह्मी योजिलें आहे. तळेगांवासारख्या महाराष्ट्राच्या केंद्रस्थानीं अशी व्यापक संस्था अस्तित्वांत आली ह्मणजे महाराष्ट्रविद्याप्रसारकमंडळाचीं दुय्यम विद्यालयें प्रत्येक जिल्ह्यांत स्थापितां येतील. अशा प्रचंड कार्यास सर्व प्रकारें साहाय्य करण्यास सर्व देशाभिमानी लोक सिद्ध होतील अशी उमेद आहे.

समर्थविद्यालय, तळेगांव–दाभाडे.
दासनवमी शके १८२९.

**मोरेश्वर गोपाळ देशमुख.**
**बाळ गंगाधर टिळक.**
**दाजी आबाजी खरे.**
**चिंतामण विनायक वैद्य.**
**विष्णु गोविंद विजापूरकर,**
चिटणीस.

---


रा. रा. ग. ब. मोडक याचीं पुस्तकें.

**सौराष्ट्र अथवा काठेवाड.**

( प्रांताचें संक्षिप्त वर्णन व इतिहास. )

पुस्तकांचे शेवटीं नकाशा जोडला आहे. निर्णयसागर छापखान्यांत छापविलेलें व सुंदर कापडी पुठयाचें. किं. १ रु. ४ आ.

(भागवत दशमस्कंधांतील प्रकरणें, शिवकल्याणकृत ओंविबद्ध टीकेसहीत.)

**रासपंचाध्यायी, किंमत. १ रु.**

**कृष्णजन्म, किंमत रु. १**

**नित्यनिमय** ( दुसरी आवृत्ति ) किं० २ आणे.
**ज्ञानगुटिका** ( दुसरी आवृत्ति ) किं० ३ आणे.
**पापपुण्य** ( तिसरी आवृत्ति ) किं० ३ आणे.

वरील सर्व पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील.

**विश्वनाथ बळवंत मोडक,**
रविवार पेठ, **कोल्हापूर** सिटि, **स. म. कंट्री.**

# कै. प्रो. बाळाजी प्रभाकर मोडककृत पुस्तकें.

## शास्त्रीय.

| | किंमत रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| बालबोध यंत्रस्थितिशास्त्र, कोरीव आकृतींसह पृष्ठें १०४ ... | १ | ० | ० |
| निरिंद्रिय रसायन शास्त्र उत्तरार्ध भाग १, धातुरूप तत्वें पृष्ठें २५२ | २ | ० | ० |
| सदर उत्तरार्ध भाग २, धातुरूप तत्वें व कर्तव्य रसायन शास्त्र पृ. २८५ | २ | ४ | ० |
| सेंद्रिय रसायन शास्त्र, पूर्वार्ध भाग, १ पृष्ठें ३१३ ... ... | ३ | ० | ० |
| सदर पूर्वार्ध भाग २, पृष्ठें ५७६ ... ... | ५ | ० | ० |
| लार्डनकृत उष्णता शास्त्राचें भाषांतर (कोरीव आकृतींसह) पृ. २८८ | ३ | ० | ० |
| आरोग्यशास्त्र भाग १, पृष्ठें १४६ १८८ भाग २, पृष्ठें १२४ | १ | ८ | ० |
| बालबोध रसायनशास्त्र ( अधातुरूप तत्वें ) पृष्ठें २३२ ... | २ | ० | ० |
| ग्यानोकृत सृष्टिशास्त्र पूर्वार्ध भाग २, उष्णता, पृष्ठें २०१ ... | १ | ८ | ० |
| सदर उत्तरार्ध भाग, विद्युत् आणि चुंबन पृष्ठें ३०४ ... | २ | ८ | ० |
| सदर भाग २, ध्वनि व प्रकाश पृष्ठें २२८ ... ... | २ | ८ | ० |
| पदार्थवर्णन भाग १, खनिज पदार्थ पृष्ठें ११८... ... ... | ० | १२ | ० |
| सदर भाग २, उद्भिज व प्राणिज पदार्थ पृष्ठें १४३ ... | १ | ० | ० |
| प्राणिशास्त्राचीं मूलतत्वें ( छापत आहे ) | | | |

## ऐतिहासिक.

दक्षिणेंतील मुसलमानी राज्याचा इतिहास—

भाग १, ब्राह्मणी ( बहामिनी ) राज्याचा इतिहास पृष्ठें २४९ १–८–०

भाग २, विजापूरच्या आदिलशाही राज्याचा इतिहास पृष्ठें २८० १–८–०

भाग ३, अहमदनगरच्या, गोवळकोंडें, बेदर व वऱ्हाड येथील राज्यांचा आणि विजयानगराच्या राज्यांचा इतिहास पृष्ठें २१६ १–०–०

शक व सन यांची तिथी व तारीखवार जंत्री. पुरवणीसह. सन १७२८ ते १९१३ पर्यंत. पुष्टें ४५० ... ... ... ... २–८–०

कोल्हापूर व कर्नाटक प्रांतांच्या ग्याझिटियरचें भाषांतर पृष्ठें ६६० ... ४–८–०

**विश्वनाथ बळवंत मोडक,**

रविवार पेठ, कोल्हापूर सिटि, **स. म. कंट्री.**

विद्यार्थी व त्यांचे पालक यांनीं इकडे अवश्य लक्ष्य द्यावें.

## सुप्रसिद्ध वैद्यराज गद्रे यांचा शास्त्रोक्त

# सरस्वतीलेह.

मेंदुगत विकार, आंकडी, अपस्मार, कफ, जिव्हाजडत्व, तोतरेपणा, बुद्धिमांद्य, अशक्तता इ. इ. वर अप्रतिम गुणकारी. मुलें जन्मल्यापासून १५ दिवसां नंतर हा लेह देत गेल्यास आंकडी अपस्मारादि विकारांमुळें मुलें दगावण्याची भीति राहणार नाहीं. त्यांस दूध चांगलें पचून तीं सशक्त होतात, जिव्हादोष नाहींसे होऊन तीं लवकर बोलावयास लागतात. क क प प करीत अडखळत बोलणारे साफ बोलूं लागतात, विद्याव्यासंगी व गाणारे यांचा मेंदू शांत राहून आवाज मधुर होतो, इ. इ. विशेष गुणांमुळें घोकंपट्टींत होणारा त्रास व काळाचा अपव्यय न होतां थोड्या वेळांत व थोड्या परिश्रमांत पुष्कळ अभ्यास होतो. हा **सरस्वती लेह** मधुर असून, **साधुसंत ज्यांचा बुद्धीवर्धनाचे कामीं प्रसंगोपात उपयोग करतात अशा दुर्मिळ वनस्पतिमिश्रित** असल्यामुळें विद्यार्थ्यांस अत्यंत अवश्यक असे अमोलिक गुण या **सरस्वती**लेहाचे सेवनानें प्राप्त होतात. **विद्यार्थ्यांकरतांच** ह्मणून किंमत **अगदींच माफक** ठेविली आहे. उत्तम गुणास ३ बा. व्ही. पी. नें रु. २।. १ बा. १ रु.

**शाळामास्तरां**कडून येणाऱ्या मागण्यांवर प्रत्येक डझना मागें त्यांस सुबक व टिकाऊ ३ रु. किमतीचें **बी टाइमपीस भेटी दाखल बक्षिस** दिलें जातें. शालोपयोगी व मुंबईंत मिळणारा हरएक प्रकारचा माल अगदीं **माफक भावानें सचित्र कॅटलॉग कलेंडर सह पा० जातो.**

सोल एजन्टस—**आठवले अँड सन्स,**

जनरल कमिशन एजन्टस,

कांदेवाडी, गिरगांव, मुंबई.

समर्थविद्यालय.

## ग्रंथमालेंतील व विश्ववृत्तांतील प्रकरणें

# विक्रीस तयार.

कोल्हापुरांतील पुष्कळशीं शिलकीचीं पुस्तकें विकून टाकावयाची असल्यानें त्याचा लवकर निकाल व्हावा याच हेतूनें पुढील सवलती देण्यांत येत आहेत. (१.) दीडशें रुपयांची पुस्तकें एकदम मागविणारास रोख फक्त रु.१०० पडतील. (२.) दहा रुपयांहून अधिक किंमतीचीं पुस्तकें मागविणारास २५ टक्के सवलत ( कमिशन ) मिळेल. (३.) दोनपासून १० रु० पर्यंत किंमतीचीं पुस्तकें मागविणारास टपालखर्च वगैरे पडणार नाहीं. ५०० ( पांचशें ) रु० हून अधिक किंमतीचीं पुस्तकें मागविणारे बुकसेलरांस विशेष सवलत मिळेल.

| | किं. रु. आ. |
|---|---|
| महाराष्ट्राचा इतिहास ( चिपळूणकरकृत भाग १ ला. अभ्युदय. ) ... ... | २–८ |
| मराठ्यांचा सत्तेचा उत्कर्ष ( ना. रानड्यांच्या पुस्तकाचें रूपांतर ) ... ... | २–८ |
| इंग्लंडचा इतिहास १५८५ पर्यंत ... ... | २–० |
| ,, १७१५ ते १८३७ | ३–६ |
| फ्रीमनकृत युरोपचें संक्षिप्त इतिवृत्त ... | ३–० |
| एडमंड बर्कचें चरित्र | १–८ |
| डॅनिअल ओकोनेलचें चरित्र. | २–० |
| रा. राजवाडे यांचा संकीर्ण लेखसंग्रह ... ... | ३–४ |
| मराठ्यांच्या इ. साधनें खंड ५ वा ... ... | २–० |
| ६ वा ... ... | ६–० |
| ८ वा ... ... | २–१२ |

| | किं. रु. आ. |
|---|---|
| काशीयात्रा ... | ०–८ |
| रसायनिक परीक्षण ... | ०–१० |
| समुद्रांत पाण्याखालून १५००० कोस पर्यटण | १–६ |
| सुलभ वेदान्तगुच्छ भाग १ | १–० |
| ,, भाग २, १४ आ. भाग ३ | १–० |
| ब्रह्मचर्य आणि गृहस्थाश्रम | ०–८ |
| स्वामी विवेकानंद यांचीं ६ व्याख्यानें, सृष्टींतील मौज व पाश्चात्य राष्ट्रांची उत्क्रांति | १–८ |
| शिवाजी आणि रामदास ... | १–० |
| अनंताशीं साधर्म्य ... | २–० |
| सनातनधर्मदीपिका ... | १–४ |
| दत्तदासतत्त्वोक्तिसंग्रह ... | ०–१० |
| जमीन, वनस्पति, प्राणी व भाजीपाल्याचा मळा ( शेती व बागाइताचा ओनामा या २ निबंधांसह) | २–८ |
| संस्कृत भाषेची विचिकित्सा | ०–१२ |
| प्राकृत भाषेची विचिकित्सा ... | ०–८ |

| | कि. रु. आ |
|---|---|
| जमीन ०-७ प्राणी | ०—७ |
| वनस्पती ०-५ भाजीपाला | ०-१२ |
| अशोक ०-१२ जपान | १—४ |
| कार्लाईल ०—१ मूत्रपरीक्षण | ०—५ |
| स्त्रीरत्नहार १-४ न्यायवैद्यक | १—८ |
| मराठी भाषेचें स्वरूप ... | ०—४ |
| महाराष्ट्र सारस्वत ... ... | ०—८ |
| परकीय अर्वाचीन भाषेचें शिक्षण | ०—६ |
| भाषिक व ऐतिहासिक लेख | ०—६ |
| खोती हक्कावर घाला ... | ०—५ |
| बर्ककृत आधुनिक असंतोष | १—० |
| ज्ञानाची सहा द्वारें व हक्सलेचे ८ निबंध ... ... | १—४ |
| निबंधपंचक अथवा राजकीय विषयक निबंध ... | १—८ |
| नवनिबंधसंग्रह १।२ प्र० ... | १—० |
| लघुनिबंधषोडशी ... ... | ०—८ |
| चर्चाविषयक निबंध ... | २—० |
| जगांतील क्रांतिकारण लढाया | २-१२ |
| औद्योगिक हिंदुस्थान ... | ०-१० |
| पैसा ... ... ... | २—० |
| स्पेन्सर सरित्र ... ... | ५—८ |
| सुखाच्या ध्रुवटोंकाचा सिद्धांत | ०—८ |
| अज्ञेयमीमांसा व आर्यवेदांत | १—३ |
| शुद्धलेखनसुधारणा अगर सरकारी बंडावा ... ... | ०-१४ |

| | कि. रु. आ. |
|---|---|
| कीटकसृष्टि ... ... | २—० |
| प्रेसिडेंट जेम्स गार्फील्ड ... | ०-१२ |
| मातृपितृसंबंध ... ... | १—० |
| मिसेस ॲनीबेझंट चरित्र व मतें | ०—६ |
| त्रिस्थळीची यात्रा... ... | ०—२ |
| कै० डॉ० आपटे यांचें चरित्र | ०—३ |
| आमचीं गळिताचीं धान्यें... | ०—३ |
| बेंजामिन फ्रँक्लीनची जबानी | ०—३ |
| राष्ट्रीयशिक्षणनिबंध ४ ... | ०-१४ |
| अतिशासन ... ... | ०—८ |
| हवा ०-४ गृहस्थाश्रम | ३—० |
| प्लेग व मीठ ०-६ सद्धर्मप्रदीप | १—४ |
| प्रकाशलेखन ०-८ धम्मपद | ०—६ |
| विचारभ्रमण १-४ दुष्काळ | ०—२ |
| वाचन ०-१० चेटूक | ०—१ |
| राष्ट्रीय शिक्षण निबंध ४ | ०—८ |
| प्रासंगिक लेखसंग्रह ... | ०—१ |
| नवनिबंधसंग्रह भा. ६... | ०—१ |
| नवनिबंधसंग्रह भा. ७... | ०—१ |
| निबंधाष्टक ... ... | ०—१ |
| निबंधदशक ... ... | १—२ |
| विश्वाध्यास ... ... | ०—६ |
| वैदिकनिबंध ... ... | ०—४ |
| आयौगिक व शास्त्रीय निबंध | १—८ |

**विष्णु गोविंद विजापूरकर.**

**ता० क०**—सर्व व्यवहार व पत्रव्यवहार रा० शं० दा० वाळिंबे, अजरशरणम्, शाहुपुरी कोल्हापूर या पत्यावर करावा.

**वि० गो० वि०**

## समर्थविद्यालय.

**समर्थविद्यालय** नाम शाला । नवी तुह्मी स्थापिलि ही कशाला ? ॥
प्रश्ना अशा उत्तर काय द्यावें ? । समक्ष येवोनि जनीं पहावें ॥ १ ॥
खरी शास्त्रविद्या खरा तत्त्वबोध । खरे ज्ञान विज्ञान आणीक शोध ॥
अशा गोष्टिचें नांव नाहीं जयांत । कशाला रहावें अशा शिक्षणांत ॥ २ ॥
प्रधानत्व पावे जिथें आंग्लभाषा । जिथें मेळवी अर्धचंद्र स्वभाषा ॥
तिथें स्वाभिमाना कसा होय थारा ? । अशा पारतंत्र्यीं असे देश सारा ॥ ३ ॥
जयें निर्मिले कष्टकारी हमाल । तया मानिती शिक्षणाची कमाल ॥
परीक्षा तरी मेळवीती घबाडें ? । नव्हे राहिलीं देहमात्रें चिपाडें ॥ ४ ॥
स्वभाषेंतुनी शिक्षणा दीधल्यानें । कसें ज्ञान होतें कळे पाहिल्यानें ॥
परी आपुलीं जाति बाळें थकूनी । पहावें कुणी ? सर्व जाती फसूनी ॥ ५ ॥
स्वदेशासि आली विपत्ति अभद्रा । तरी सोडिना कां तुह्मां घोर निद्रा ? ॥
उठा व्हाच जागे बहु द्रव्य वेंचा । नेंका जाऊंद्या काळ आतां फुकाचा ॥ ६ ॥
प्रयत्न केल्या यश ये न काय । ज्याला तुह्मी बांधव हो सहाय ॥
ह्मणूनि तैसा पहिलाच केला । **समर्थविद्यालय** नाम शाला ॥ ७ ॥
अधिष्ठान हें ब्रह्मचारिव्रताचें । तसें स्थान हें नीतिसंरक्षणाचें ॥
स्वधर्म–स्वदेश–स्वभाषाभिमान । वसेना कुठेंही पहा या समान ॥ ८ ॥
स्वदेशीव्रता चालवाया यशानें । बना शिक्षणानें स्वदेशी मनानें ॥
नसे याविणें अन्य कांहीं उपाय । पुरे व्हा **स्वदेशी** स्मरा **रामपाय** ॥ ९ ॥
विना द्रव्य गेले विना कष्ट केले । मनींचे कुणी हेत सिद्धीस नेले ? ॥
किती द्रव्य देऊं किती ठेउं मागें । नका आणुं ऐसें मनीं हेंचि मागे ॥ १० ॥

---

# महाराष्ट्रविद्याप्रसारकमंडळ.

१. महाराष्ट्रविद्याप्रसारकमंडळाचे खालीं सही केलेले गृहस्थ अधिकारी पंच असल्यानें त्यांपैकीं कोणाकडेही [illegible] संस्थेस द्रव्यसहाय्य करणांरानीं आपली देणगी पाठवावी.

२. रा. रा. विष्णु गोविंद विजापूरकर हे या संस्थेचे चिटणीस व खजिनदार असल्यानें सर्व रकमा त्यांच्याकडे पाठविण्यांत येतील व ते कोणत्याही एक अगर अनेक स्वदेशी बँकांत त्या व्याजीं लावतील.

३. या संस्थेच्या कार्यास आतां नेटानें प्रारंभ झाल्यानें व त्याच्या सिद्धीस द्रव्याचीच मोटी नड आल्यानें ज्या कोणास वार्षिक किंवा एकदम देणगी देणें असेल त्यांनीं ती पाठविण्यास विलंब करूं नये.

४. या संस्थेचें विद्यालय तळेगांव दाभाडे येथें समर्थविद्यालय या नांवानें काढलें आहे. त्यांत सर्व वर्गाच्या बुद्धिशिक्षणाची व बऱ्याच धंदेशिक्षणाची सोय करण्यास दरमहा ७०० पासून ८०० रुपयेपर्यंत अजमासें खर्च येईल. इतकी मदत जरूर झाली पाहिजे. पुढें जसजशी मदत मिळेल तसतशी इतर (जिल्ह्यांच्या) ठिकाणीं विद्यालयें काढण्यांत येतील.

५. समर्थविद्यालयांत धंदेशिक्षणाची मध्यम स्थितीची सोय करण्यासाठीं एक रसायनशाला (Laboratory) व कार्यगृह (Workshop) जोडणें अवश्य आहे. त्याकरितां दोन्ही मिळून सुरवातीच्या खर्चासाठीं २० हजार रुपये तरी निदान जरूर पाहिजे आहेत.

मोरेश्वर गोपाळ देशमुख. बाळ गंगाधर टिळक.

चिंतामण विनायक वैद्य. दाजी आबाजी खरे.

विष्णु गोविंद विजापूरकर.